रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ८२ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

**उद्या अंक नाही!**
गणेश चतुर्थीनिमित्त बुधवार, दि. २७ ऑगस्ट २०२५ रोजी कृषीवल कार्यालयाला सुट्टी असल्याने गुरुवार, दि. २८ ऑगस्टचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची सर्व वाचक, वितरक, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २७ ऑगस्ट २०२५
किंमत ४ ₹

**नवीन फ्लॅट विकणे आहे**
पूर्व पश्चिमेस असलेल्या एका मजल्यावर दोन 2BHK फ्लॅट विकणे आहे.
5th स्लॅब RCC कम्पलिटेड.
श्री प्रकाश अपार्टमेंट.
श्री. कृपा बिल्डर्स
स्वामी समर्थ मंदिरासमोर, पिंपळभाट,चेंढरे-अलिबाग
संपर्क : 94226 96133 / 99231 84701







## सुहाना खानच्या जमीन खरेदी प्रकरणात शर्तभंग!



**प्रशासनाचे धाबे दणाणले**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

बॉलिवूडचा किंग खान अर्थात शाहरुख खानने आपल्या 'जवान' चित्रपटाने भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा देणारी व्यक्तिरेखा साकारली होती. पण, म्हणतात ना चित्रपटात असते ते ते सारे सत्य नसते. असेच काहीसे चित्र अलिबाग तालुक्यात थळ येथे पाहावयास मिळाले. शाहरुख खानची मुलगी सुहाना खान हिने खरेदी केलेल्या जमिनीमध्ये शासनाची जागा लाटल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. म्हणजेच, शासकीय जमिनी बळकावण्याचा भ्रष्टाचार केल्याचे तक्रार अर्ज शासन दरबारी दाखल झाले आहेत. दैनिक कृषीवलच्या वृत्ताने जिल्हा प्रशासने खडबडून जागे होत संबंधित जागेचा वास्तवदर्शी अहवाल सादर करण्याचे आदेश तहसीलदार अलिबाग यांना दिले. तहसीलदारांनी आदेशानुसार स्थळपाहणी करून अहवाल सादर केला असून, या अहवालात शर्तभंग झाल्याचे दिसून येत असल्याचा प्राथमिक अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर केला असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. यामुळे सुहाना शाहरुख खान यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

जिल्हा प्रशासनाने येत्या शुक्रवारी सचित्र वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश तहसीलदार अलिबाग यांना दिले आहेत. यामुळे चित्रपटात भ्रष्टाचाराविरोधात लढा देणारा जवान अर्थात शाहरुख खान आपल्या कन्येला वाचविण्यासाठी कोणती शक्कल लढवणार,

> अलिबाग तालुक्यातील थळ येथे सर्वे क्रमांक ३४५/२ या जागेत शर्तभंग झाल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत. त्याच जमिनीसाठी वर्ग १ मधून वर्ग २ करण्यासाठीचा अर्जदेखील प्राप्त झाला आहे. अलिबाग तहसीलदार यांना संबंधित तक्रारीनुसार सर्वे करून सचित्र आणि वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्यात येईल.
> – संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड

•> पान २ वर

## गणेशोत्सवात प्रवाशांचे हाल

- जिल्ह्यातील ४०० हून अधिक फेऱ्या रद्द
- तीन दिवसांत १७ हजार किलोमीटरच्या प्रवासाला ब्रेक

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मुंबईतील चाकरमान्यांना कोकणात आणण्यासाठी रायगड जिल्ह्यातून २२६ एसटी बसेस मुंबई, ठाणे येथे पाठविण्यात आल्या. त्यामुळे जिल्ह्यातील ४०० हून अधिक एसटीच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या. परिणामी, दि. २३ ते २५ ऑगस्ट या कालावधीत १७ हजार किलोमीटरच्या प्रवासाला ब्रेक लागला. त्याचा परिणाम जिल्ह्यातील ग्रामीण भागातील बसफेऱ्यांवर झाला. ऐन सणासुदीत ग्रामीण वाहतूक ठप्प झाल्याने प्रवाशांचे मात्र हाल झाले.

एसटी महामंडळ रायगड विभागाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, कर्जत, रोहा, माणगाव, महाड, मुरूड, श्रीवर्धन असे आठ एसटी बस आगार आहेत. या आगारात ४७० हून अधिक एसटी बसेस आहेत. जिल्ह्यात अडीच हजारांहून अधिक कर्मचारी आहेत. त्यात दीड हजार चालक व वाहकांचा समावेश आहे. एसटीतून नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एसटी एक जीवनवाहिनी ठरत आहे. शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसह नोकरी, व्यवसायानिमित्त तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी जाणाऱ्या कामगारांना एसटी

> गणेशोत्सवाच्या निमित्ताने बाजारात खरेदीसाठी बसची अपेक्षा होती. मात्र, २३ ऑगस्टपासून तीन दिवस ग्रामीण भागातील बसफेऱ्या रद्द केल्याने त्याचा फटका शाळा, महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह नियमित प्रवास करणाऱ्या आम्हा प्रवाशांना बसला. त्यामुळे बसस्थानकात तासन्तास ताटकळत बसावे लागले.
> – साक्षी जाधव, प्रवासी

> चाकरमान्यांना कोकणात आणण्यासाठी रायगड जिल्ह्यातून २२६ एसटी बसेस पाठविण्यात आल्या होत्या. अपुऱ्या बसेसमुळे काही फेऱ्या रद्द कराव्या लागल्या.
> – दिपक घोडे, विभाग नियंत्रक, रायगड

•> पान २ वर

## आज बाप्पाची प्राणप्रतिष्ठा

। अलिबाग । प्रतिनिधी ।



जिल्ह्यात एक लाख दोन हजार ४८४ गणेशमूर्तींची प्राणप्रतिष्ठापना बुधवारी (दि.२७) होणार आहे. त्याची तयारी पूर्ण झाली आहे. गणरायाच्या स्वागतासाठी गणेशभक्त सज्ज झाले आहेत. पूजनासाठी लागणारे साहित्य, फळे, फुले खरेदीसाठी मंगळवारी सकाळपासून बाजारपेठा सजल्या होत्या. पाऊस सुरु असतानादेखील बाप्पाच्या स्वागतासाठी लागणारे साहित्य खरेदीचा उत्साह दिसून आला. बाजारपेठांमध्ये अफाट गर्दी झाली होती.

जिल्ह्यामध्ये एक लाख दोन हजार ४८४ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. दीड दिवसाचे २५ हजार ५५१, पाच दिवसांचे एक हजार ३२२, सात दिवसांचे ५६ हजार ४६८ तसेच अकरा दिवसांचे म्हणजे अनंत चतुर्दशीच्या १८ हजार २११ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे.

•> पान २ वर









# विमानतळ नामकरणाचा वाद पेटला

## ● न्यायालयात जनहित याचिका दाखल

। उरण । प्रतिनिधी ।

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला ''लोकनेता दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ'' असे नाव देण्याचा प्रश्न पुन्हा पेटला आहे. केंद्र सरकारकडून होत असलेल्या विलंबाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.**

ही याचिका ''प्रकाशझोत सामाजिक संस्था'' या माध्यमातून विकास परशुराम पाटील यांनी दाखल केली असून, त्यात केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, सिडको, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. तसेच अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड यांना प्रतिवादी करण्यात आले आहे.



(संग्रहित छायाचित्र )

राज्य सरकारने आधीच नामकरणाचा ठराव मंजूर करून केंद्राकडे पाठवला असतानाही अंमलबजावणीस विलंब होत आहे. दरम्यान, विमानतळाच्या उद्घाटनाची तारीख निश्चित झाली, तरी नामकरणाचा प्रश्न जैसे थे आहे. यामुळे प्रकल्पग्रस्त व स्थानिक जनतेत प्रचंड नाराजी उसळली आहे. दि.बा. पाटील हे प्रकल्पग्रस्तांचे खरे तारणहार. त्यांचे नाव विमानतळाला देण्याची मागणी जनतेचा आक्रोश बनली असून, आता ती थेट न्यायालयीन लढ्यात परिवर्तित झाली आहे.

न्यायालयीन सुनावणीत केंद्र सरकारची खरी भूमिका स्पष्ट होणार आहे. ''विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव द्यायचे ठरवले आहे की नाही, याबाबतचा पत्रव्यवहार सादर करावा,'' असा ठणकावलेला मजकूर याचिकेत नमूद करण्यात आला आहे.

## कोमसापच्या जिल्ह्याध्यक्षपदी संजय गुंजाळ

**मुरुड जंजिरा :** कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा कार्यकारिणीची सभा रोहा येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत संजय गुंजाळ यांची कोकण मराठी साहित्य परिषद जिल्हा रायगडच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. अध्यक्षपदाच्या निवडीनंतर जिल्हा प्रतिनिधीपदी गणेश कोळी, उपाध्यक्षपदी पुरुषोत्तम मुळे, सचिवपदी संजय होळकर, खजिनदारपदी गोपाळ शेळके, कार्याध्यक्षा रेखा कोरे, जिल्हा समन्वयक सुखद राणे यांची निवड करण्यात आली. सभेसाठी अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यकारिणी निवडीनंतर मावळते अध्यक्ष सुधीर शेठ यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष संजय गुंजाळ व सर्व कार्यकारिणीचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# उरण-न्हावा शेव्यात नवे पोलीस कप्तान

। उरण । प्रतिनिधी ।

उरण शहर, तालुका आणि न्हावा-शेवा परिसरात गेल्या काही महिन्यांपासून अवैध धंद्यांना आणि नशेच्या पदार्थांच्या विक्रीला ऊत आला होता. स्थानिक नागरिक, व्यापारी व पालक यामध्ये प्रचंड चिंतेचे वातावरण होते. मात्र, एसीपीपदी गायके व उरणच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी हनीफ मुलाणी आणि न्हावा-शेवा पोलीस ठाण्याचे नेतृत्व दीपक सुर्वे यांच्या हाती गेल्यामुळे या अवैध कारवायांना आळा बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

उरणचे माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांची सहायक पोलीस आयुक्त म्हणून बदली झाल्यानंतर गुन्हे शाखेतील अनुभवी अधिकारी हनीफ मुलाणी यांची उरणमध्ये नियुक्ती झाली आहे. मुलाणी यांचा गुन्हेगारी उकल व धडक कारवाईचा भक्कम अनुभव आहे. त्यांनी पनवेल, सानपाडा, वाशी यांसारख्या ठाण्यांत काम करताना अनेक गुन्हेगारी टोळ्यांना धडा शिकवला आहे.

दरम्यान, न्हावा-शेवा या संवेदनशील व बंदर परिसरातील पोलिस ठाण्याचे सूत्र आता दीपक सुर्वे यांच्या हातात आले आहे. काही दिवसांपूर्वी वाहतूक खात्यात बदली झालेले सुर्वे आता पुन्हा एकदा वरिष्ठ निरीक्षकपदी रुजू होत आहेत. गेल्या काही काळात उरण व न्हावा-शेवा परिसरात बेकायदेशीर बांधकामे, मटका-जुगार, अवैध दारू, नशीली पदार्थांची विक्री यामुळे कायदा-सुव्यवस्थेची वाट लागली होती. आता तरी या नव्या अधिकाऱ्यांनी धडक कारवाई करून हा सगळा 'गुन्हेगारी बाजार' बंद करावा, अशी जनतेतून जोरदार मागणी होत आहे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
**उपसंचालक भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश मुंबई यांचे कार्यालय**
डी. डी. बिल्डींग. १ ला मजला जुने जकात घर, शहीद भगतसिंह मार्ग
फोर्ट मुंबई - ४००००१ फोन २२६६०६५२, २२७०१७३८
ddlrmumbai@gmail.com

नोटीस — क्र. पुनरिक्षण अर्ज क्र. ४२२/२०२४/२०२५
मुंबई, दिनांक:- ०६/०८/२०२५

डाकनोंदपत्राने/हस्तबटवडा
प्रति,
सौ. मिलन संतोषकुमार साने — अर्जदार
मु. गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड आणि
सध्या मु. ३६. एम. भिवंडकर हाऊस, तळमजला,
रूम नं. १. मुगभाट, कांसलेन, मुंबई ४००००४
विरूद्ध
१) श्रीमती मनोरमाबाई मनोहर नार्वेकर,
२) श्री. दत्तात्रेय सदाशिव नार्वेकर
१ व २ मु. महायोग नगर, चिंचवली पो. गोरेगाव — जाबदार
ता. माणगाव, जि. रायगड आणि
मु. ३८/एच, बोरीचाळ, पहिला मजला, रूम नं. ५४,
कामरेश्वर मार्ग, फणसवाडी, मुंबई- ४००००२
०३) उप अधिक्षक भूमी अभिलेख, माणगाव.

**विषय :-** महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५७ अन्वये पुनरिक्षण अर्ज मौजे गोरेगाव, ता. माणगांव येथील नं. भू.क्र. ३८४ या मिळकतीबाबत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, रायगड यांचेकडील क्र. अपील/एस आर.७५/२०२२/ता. माणगांव/जि रायगड/ २०२४. दि. २७/५/२०२४ रोजीचे आदेशाविरुद्ध पुनरिक्षण अर्ज

**संदर्भ :** अर्जदार यांचा दि. १८/१२/२०२४ रोजीचा पुनरिक्षण अर्ज

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५७ अन्वये पुनरिक्षण अर्ज**

अर्जदार यांनी मौजे गोरेगाव, ता. माणगाव येथील न.भू.क्र. ३८४ या मिळकतीबाबत जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, रायगड यांचेकडील क्र. अपील/एस आर. ७५/२०२२/ता. माणगाव/जि. रायगड/२०२४, दि. २७/५/२०२४ रोजीचे आदेशाविरूद्ध पुनरिक्षण अर्ज दाखल केलेले असून त्यामधील जाबदार यांना दि. १६/०१/२०२५, रोजीच्या आगाऊ नोटीशीने कळवून त्यामधील जाबदार १ व २ यांना त्यांचे पत्त्यावर पाठविलेली सुनावणीची नोटीस बजावली गेली नसल्यामुळे, तसेच पुनरिक्षण अर्ज क्र. ४२२/२०२४ चे प्रकरणी दिनांक ०५/०५/२०२५ दुपारी १२.०० वाजता सुनावणीस जाबदार १ व २ हे गैरहजर असल्याने सदरच्या मिळकतीबाबत जाबदार १ व २ यांनी अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाने किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी दि. ०९/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई, डी.डी. बिल्डींग, १ ला मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंह मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१ या पिठासनासमोर हजर राहून आपले म्हणणे मांडावे, अन्यथा त्यांचे काहीही म्हणणे नाही असे समजून त्यांचे अनुपस्थितीत पुनरीक्षण अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्यावी.

जाबदार १ व २ यांना अथवा त्यांचे कायदेशीर वारस यांना प्रस्तुत पुनरीक्षण अर्ज दि. ०९/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणीस सुनावणीकामी हजर राहणेसाठी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

सही/-
**(अनिल माने)**
उपसंचालक भूमि अभिलेख,
कोंकण प्रदेश मुंबई

# उरण नगरपरिषदेचा बेपर्वा कारभार

## ■ धोकादायक जाहीर इमारत अजूनही उभी

। उरण । प्रतिनिधी।

शहराच्या मध्यभागी गणपती बाजारपेठेतील ५० वर्षांहून अधिक जुनी इमारत नगरपरिषदेकडून सन २०१७ पासून धोकादायक घोषित करण्यात आली आहे. गेल्या सात वर्षांत सतत नोटिसा देऊनही ही इमारत जमीनदोस्त करण्यात आलेली नाही. शाळकरी मुलांचे, नागरिकांचे आणि वाहनधारकांचे जीव धोक्यात आले आहेत.

नगरपरिषदेकडून इतर धोकादायक इमारती जमीनदोस्त केल्या जात असताना, विश्वास मोहनलाल जैन व कांता जैन यांच्या मालकीची हीच इमारत मात्र अधिकारी वर्गाच्या संगनमतामुळे सुरक्षित ठेवल्याचा आरोप होत आहे. नगररचनाकार बिपीन निकम व निखिल ढेरे आणि इमारत मालक जैन यांच्यातील साटेलोट्यामुळे या इमारतीचे वरचे दोन मजले पाडून पत्रे टाकण्यात आले, मात्र तळमजल्यावरील दुकाने आजही खुलेआम सुरू आहेत, अशी चर्चा आहे. याची कोणतीही दखल नगरपालिका प्रशासन घेताना दिसत नाही.

गर्दीचा, वर्दळीचा परिसर, शाळकरी मुलांची ये-जा, वाहतुकीची सततची कोंडी यामुळे कोणत्याही क्षणी ही भग्नावस्थेतील इमारत कोसळून जीवितहानी होण्याचा धोका आहे. यासंदर्भात कडू यांनी उरण नगरपरिषदेला अर्ज देऊन तात्काळ कारवाईची मागणी केली असूनही त्याला वर्ष होण्यास येऊनही अद्याप कोणतीही दखल अथवा कारवाई नगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आलेली नाही. अपघात झाल्यास थेट नगरपरिषद व अधिकारी वर्ग याला सर्वस्वी जबादार असणार आहेत. नगरपरिषद प्रशासन जागे होणार की एखाद्या दुर्घटनेचीच वाट पाहणार? अशी खमंग चर्चा उरणच्या जनतेत सुरू आहे.

## मराठे मुंबईत धडकणारच : साबळे

**पनवेल :** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी ही अंतिम लढाई असल्याचे मनोज जरांगे-पाटील यांनी जाहीर केल्याने २९ ऑगस्ट रोजी उपोषणासाठी मराठे मुंबईमध्ये धडकणार आहेत, असा इशारा मराठा समन्वयक विनोद साबळे यांनी दिला आहे. ते पुढे म्हणाले की, रायगडातील लाखो मराठे मनोज जरांगे-पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी मुंबईत जाण्याची तयारी करत आहेत. जरागेंच्या उपोषणाच्या घोषणेमुळे मराठ्यांचे रक्त पुन्हा एकदा पेटून उठले आहे. गणेशोत्सवाचा काळ जरी असला तरी शांततेत आंदोलन होणार आहे. लक्ष्मण हाके हे ज्या समाजाचे आहेत त्यांनी त्या समाजाचे प्रश्न सोडवावेत. आमच्या आरक्षणाला विरोध करुन ते त्यांच्या बोलविता धनी याला खूष करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधाच्या हाकांना न जुमानता मराठे लढाई लढतील, असे विनोद साबळे यांनी सांगितले.

# उरणकर वाहतूक कोंडीने बेजार

। उरण । प्रतिनिधी ।

गेल्या काही दिवसांपासून उरणातील नागरिक वाहतूक कोंडीमुळे बेजार झाले आहेत. वारंवार उद्भवणाऱ्या अशा वाहतूक कोंडीमुळे कामानिमित्ताने बाहेर पडलेल्या नागरिकांचे हाल होत आहेत. त्यात गव्हाण फाटा रस्त्याच्या मधोमध डंपर अडकल्याने रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी सदर बंद पडलेला डंपर बाजूला करताना वाहतूक पोलिसांची दमछाक झाली होती



उरण, जेएनपीए, बेलापूर, पनवेल मार्गावरून परिसरातील हजारो नोकरदार कामानिमित्ताने नवी मुंबई, जेएनपीए बंदर तसेच पनवेलच्या दिशेने वाहतूक करतात. त्यात बुधवारी गणेशोत्सव असल्याने बाप्पाच्या आगमनापूर्वी बाजारपेठतून सामानाची जमवाजमव करण्यासाठी नागरिकांनी आपापल्या कुटुंबासह रस्त्यावरुन मार्गक्रमण केले. मात्र, वाहतूक पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी ४.४५ च्या सुमारास गव्हाण फाटा रस्त्यावर मधोमध डंपर बंद पडला. त्याचा परिणाम येथील वाहतूक व्यवस्थेवर झाला. कोंडीमुळे कामानिमित्ताने बाहेर पडलेल्या नागरिकांचे हाल झाले. एकंदरीत, डेब्रिजची वाहतुकीवर बंदी असतानाही हे वाहन येथे कसे पोहोचले, असा प्रश्नही आता विचारला जात आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RFx (E-TENDER) NOTICE**

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| RFx (Tender) No. | Name of work | Estimated cost in Rs. | EMD (Rs.) | Tender Fee incl. GST (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 7000037435 | AMC for Loading/unloading, Erection/ Dismantling of ICT/Transformer and Transportation of various EHV & HV Equipments at various S/stns for F.Y.2025-26 under HVDC RS (O&M) Circle, Padgha. | 85,00,000/- | 85,000/- | 590/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From- 27.08.202 from 00.00 hrs. to 11.09.2025 up to 10.00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 11.09.2025 up to 10.00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 11.09.2025 up to 11.00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 11.09.2025 up to 13.00 hrs. (If possible) |

**Contact Person: The Executive Engineer (ADM),** HVDC RS (O&M) Circle, Padghe,
Mob. No: 9011021483
For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**HVDC RS O&M Circle, Padghe**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पोखरकरवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्रीमती कमल पांडूरंग शिर्के उर्फे सौ.विद्या विजय सावंत यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| ३१ | १६ | ०-१७-०० | ०.१६ |
| ३१ | १७ | ०-१२-०० | ०.०९ |
| ३१ | १८ | ०-७९-०० | ०.६३ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०८/२०२५

**ॲड.राकेश भरत भोईर**
ऑफीस- कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९९४१८५२

# आजपासून घुमणार आरती, भजनांचे सूर

## मुरूडमध्ये ५२५९ होणार गणपतींचे आगमन

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड शहरासह पंचक्रोशीत ५२५९ गणपती गणपती बाप्पाचे आगमन होणार आहे. प्रत्येक घरोघरी बाप्पांची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे.

गणरायाचे आगमनाने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण होणार आहे. त्यामुळे गावागावांत आरती आणि भजनाचे मंजूळ स्वर ऐकायला मिळणार आहेत. चार दिवस विश्रांती घेतलेला पाऊस मंगळवारी सकाळपासून सुरू झाला असल्याकारणाने गणेशभक्त नाराज दिसत आहेत. पावसाने अधूनमधून थोडी उसंत घेतल्यावर भक्त उत्साहाने गणेशशाळांमधून मूर्ती घरोघरी आणत आहेत. प्रत्येक गावात गणरायाचे स्वागत मोठ्या उत्साहात केले जाते. कोकणवासीय मोठ्या प्रमाणात गावाला आले असल्याने सर्वच घरांमध्ये आरास केली गेली आहे.

पान १ वरुन

## सुहाना खानच्या जमीन खरेदी प्रकरणात शर्तभंग!

याकडे लक्ष लागले आहे.

या जागेसंदर्भात थळ ग्रामपंचायत, ॲड. विवेकानंद ठाकूर आणि थळ ग्रामस्थांच्या सहा अशा एकूण आठ तक्रारी जिल्हा प्रशासनाच्या दरबारी दाखल झाल्या आहेत. दाखल झालेल्या तक्रारीनुसार, जिल्हा प्रशासनच्या महसूल विभागाने अलिबाग तहसीलदार यांच्या कोर्टात या तक्रारींचा चेंडू टाकला. अलिबाग तहसीलदार यांनी आपल्या यंत्रणेला सतर्क करीत सुहाना खान यांनी खरेदी केलेल्या जमीनच सर्वे केला. स्थळपाहणी करून तेथे पंचनामा करण्यात आला. या पंचनाम्यात सर्वे करणाऱ्या यंत्रणेने केलेल्या तक्रारी योग्य असून शर्तभंग झाला असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करून तसा अहवाल तहसीलदार अलिबाग यांना सादर केला. तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या अहवालानुसार तहसीलदार यांनी जिल्हा प्रशासनाला शर्तभंग झाला असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचे कळवले आहे. यामुळे सुहाना खान यांचे धाबे दणाणले आहेत.

सुहाना खान यांनी जागा खरेदी करण्यापूर्वी ती जागा खोटे यांच्याकडे होती. त्यांनी २०२२ मध्ये सदरची जागा वर्ग १ मधून वर्ग २ करण्यासाठीचा महसूल शाखेकडे प्रस्ताव सादर केला. परंतु या जागेसंदर्भात तक्रारी दाखल झाल्याने जिल्हा प्रशासनाच्या महसूल शाखेने याबाबत अलिबाग तहसीलदार यांच्याकडे प्रकरण पाठवले. अलिबाग तहसीलदार यांच्याकडून येणाऱ्या अंतिम अहवालाची महसूल शाखा प्रतीक्षा करीत आहे. अद्याप या जागेबाबतचा अंतिम अहवाल जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला नाही. यामुळे सुहाना खान यांनी खरेदी केलेली जागा वर्ग १ ची वर्ग २ अद्याप झालेली नाही. असे असताना शासनाचे नियम धाब्यावर बसवून त्या जागेत जिल्हाधिकारी रायगड यांची कोणतीही परवानगी न घेता बिनबोभाट टोलेजंग इमला उभारण्यासाठीच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. काहीअंशी नियमबाह्य बांधकाम या जागेत करण्यात आले आहे. यामुळे सुहाना खान यांनी शर्तभंग केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचे नाव न सांगण्याच्या अटीवर एका अधिकाऱ्याने सांगितले.

## गणेशोत्सवात प्रवाशांचे हाल

बसचा कायमच उपयोग होतो.

जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरु आहे. बुधवारी (दि.२७) बाप्पाचे आगमन घरोघरी होणार आहे. त्यानिमित्ताने अलिबागसह अन्य तालुका व जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी जाण्याची लगबग गेल्या अनेक दिवसांपासून सुरु होती. परंतु, खरेदीसह नोकरी, शिक्षण, दैनंदिन कामासाठी एसटीने जाणाऱ्या भक्तांसह विद्यार्थी, कामगारांचे तीन दिवस प्रचंड हाल झाले.

मुंबई व ठाणे येथे नोकरी व्यवसायानिमित्त असणाऱ्या चाकरमान्यांना कोकणात आणण्यासाठी रायगड जिल्ह्यातून २२६ एसटी बसेस पाठविण्यात आल्या. २३ ऑगस्टपासून या बसेस ठाणे व मुंबईत पाठविण्यात आल्या होत्या. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एसटी फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. त्याचा फटका अन्य प्रवाशांसह खरेदीसाठी बाजारात जाणाऱ्या भक्तांना बसला. ग्रामीण भागात जाण्यासाठी बस उपलब्ध नसल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. ग्रामीण भागामध्ये ठराविकच बसेस पाठविल्या जातात. त्यात सणासुदीत फेऱ्या रद्द झाल्यामुळे प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.२३ ऑगस्ट रोजी पाच हजार २६५ किलोमीटर, २४ ऑगस्ट रोजी सहा हजार ६३ व २५ ऑगस्ट रोजी सहा हजार १४९ किलोमीटर अशा तीन दिवसांमध्ये १७ हजार ४७७ किलोमीटरच्या प्रवासाला ब्रेक लागला आहे. त्याचा फटका प्रवाशांना बसला.

## आज बाप्पाची प्राणप्रतिष्ठा

मंगळवारी सकाळपासून पावसाने जोर धरला होता. काही भागांमध्ये पावसाची रिमझिम सुरु होती. परंतु, दुपारनंतर पावसाने काही प्रमाणात विश्रांती घेतल्यावर भक्तांनी खरेदीसाठी बाजारात गर्दी करण्यास सुरुवात केली. बोलता-बोलता बाजारपेठा फुलून गेल्या होत्या. बाप्पाचे आगमन तसेच प्रतिष्ठापना बुधवारी होणार आहे. त्यामुळे काहींनी मंगळवारी सायंकाळी गणेशमूर्ती घरी आणण्याचा प्रयत्न केला. काहीजण बुधवारी सकाळी मूर्ती आणून प्रतिष्ठापना करणार असल्याचे सांगण्यात आले. गणपत्ती बाप्पा मोरया... असा जयघोष करीत बाप्पाचे स्वागत करण्यात आले. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्यावतीने यावर्षी नशामुक्तीसह बेटी बचाव बेटी पढाव, स्वच्छतेविषयी चलचित्राचे सादरीकरण करणार आहे. दीड दिवसांपासून पाच, सात व दहा दिवस वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहेत. पारंपरिक भजनांसह जाखडी नृत्यांचे सादरीकरण केले जाणार आहे. वेगवेगळे सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम राबविले जाणार आहेत.

सिडको
शहरांचे शिल्पकार

**नोटीस-१**

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व १) अभय दिनकर पाटील २) सुनिता दिलीप सालवी ३) अतुल दिनकर पाटील ४) अंजली अशोक भगत राहणार - जासई, ता. उरण, जि. रायगड - ४०७०२ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. युक्का डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे डायरेक्टर श्री. नरेश चंद्रकांत बिराजदार यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३५८८ | ३१.०७.२०२५ | पुष्पक नोड | २६ | ३६९ | १३३०.०० चौ. मी. | ०६.०४.२०२३ | २७.०४.२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)
CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२३४/२०२५-२६

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत, त्या मिळकतीचे मालक १) गजानन सखाराम पाटील/शेळके व २) मनोज सखाराम पाटील उर्फ मनोहर सखाराम शेळके वगैरे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २४ | ४ | १-०६-०० | १-४४ |

सबब सदर वर नमुद केलेल्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेली मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील वर्णनाच्या मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २७/०८/२०२५

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता.कर्जत,
जि.रायगड -४१०२०१.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Estimated cost |
|---|---|---|
| **Tend-10/25-26 7000037059 - 2nd call** | Replacement of existing VRLA battery set by conventional lead acid battery sets alongwith chargers at various substations under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 5000/- +GST** | **Rs. 124.31 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 25.08.2025 to 05.09.2025 up to 11:00 hrs, Opening date:-05.09.2025 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm)
Tel No. 022-27459625, Mob. No. 9167026131
E-mail ID : **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे.कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्रीमती कमल पांडूरंग शिर्के उर्फे सौ.विद्या विजय सावंत यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| ४१ | २ | ०-४०-०० | १.५० |
| ४० | १२/ब/२ | ०-५३-०० | ०.३५ |
| ४० | १२/अ/१ | २-३८-९९ यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र २-१५-९९ | २.६० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०८/२०२५

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९९४१८५२

# आधुनिक बंटी-बबलीला अटक

## ।। उरण पोलिसांची दमदार कामगिरी ।। राज्यातील २२ ठिकाणी घरफोडी उघड




। चिरनेर । प्रतिनिधी ।

राज्यातील विविध जिल्ह्यांत २२ ठिकाणी घरफोड्यांसह चोऱ्या करणाऱ्या आधुनिक बंटी आणि बबलीला उरण पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. नवनीत नाईक (४५) व स्मिता नाईक (४१) अशी या दाम्पत्याची नावे आहेत.

उरणमधील दादरपाडा येथील रहिवासी राजु झुगरे (४४) यांच्या घराची नवनीत नाईक आणि स्मिता झुगरे यांनी रेकी केली होती. ते देखील त्याच गावात भाड्याने राहत होते. ८ ऑगस्ट रोजी राजु झुगरे हे दुपारच्या सुमारास कामानिमित्ताने घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. त्याचाच फायदा घेत नवनीत नाईक व स्मिता नाईक यांनी बनावट चावीने कुलूप खोलले. त्यानंतर दरवाजा उघडून बेडरूमच्या वार्डरुफमध्ये ठेवण्यात आलेले दागिने व रोख रक्कम असे एकूण १३ लाख ७१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल घेऊन पलायन केले. त्यानंतर रातु झुगरे घरी आल्यावर त्यांना घरात चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी लगेचच उरण पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवताच गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणी उरण पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संजय राठोड यांच्यासह सहा पोलिसांचे पथक तयार करून तपासाला सुरुवात केली. घरफोडी केल्यापासूनच आरोपी पती-पत्नी गावातुन गायब झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांचा त्यांच्यावरील संशय बळावला. त्यामुळे पोलिसांनी प्रथम नाईक दाम्पत्याचे मोबाईल नंबर शोधून काढले. त्यानंतर तांत्रिक व गोपनीय माहिती आणि सीसीटीव्ही फुटेज तपासात घरफोडी करून नाईक पती-पत्नी पालघरमधील उमरोली पालघर येथे लपून बसल्याचे उघडकीस आले. पोलीस पथकाने त्या ठिकाणी जाऊन दोन्ही आरोपींवर झडप घालून शिताफीने ताब्यात घेतले. तपासाअंती आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरीचे सर्व दागदागिने हस्तगत करण्यात आले. अधिक तपास केला असता या बंटी-बबलींवर राज्यातील विविध जिल्ह्यांतील ठिकाणी अशाच प्रकारचे एकुण २२ गुन्हे दाखल असून यापैकी नवीमुंबई, रायगड व कोल्हापूर येथील गुन्हे उघडकीस आले आहेत. काही गुन्ह्यांमध्ये या दोघांनी शिक्षाही भोगली आहे. न्यायालयाने दोघांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याची माहिती तपास अधिकारी संजय राठोड यांनी दिली.

# अमोल शितोळे यांची कामोठे विभाग अध्यक्षपदी निवड

। पनवेल । प्रतिनिधी ।



शेतकरी कामगार पक्षाच्या कामोठे विभाग अध्यक्षपदावर अमोल शितोळे यांची निवड करण्यात आली आहे. पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी पद नियुक्ती सोहळा आणि कला व सांस्कृतिक विभागाकडून आयोजित रिल्स स्पर्धेचे बक्षिस वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शितोळे यांच्यावर ही जबाबदारी टाकण्यात आली. २००३ साली कामोठे वसाहतीत राहायला आलेले अमोल शितोळे यांनी शेकाप माजी आमदर विवेक पाटील आणि माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलन केली आहेत. मानसरोवर स्टेशन सुरु व्हावे यासाठी देखील शितोळे कुटुंबाचे महत्वपूर्ण योगदान आहे. नव्याने वसवण्यात आलेल्या कामोठे वसाहतीत पाणी, रस्ते आणि विजेच्या प्रश्नांसाठी वडील मुकूंद शितोळे आणि मोठे बंधू संतोष शितोळे हे एकता सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सक्रिय होते. अशी एक ना अनेक सामाजिक कार्ये अमोल शितोळे यांच्यासह कुटूंबीयांनी केली आहेत. अमोल शितोळे यांचे काम पाहून माजी आमदार बाळाराम पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाची कामोठे विभागाची जबाबदारी अमोल शितोळे यांच्यावर सोपवली आहे.



# पनवेल शहराध्यक्षपदी दिलीप कदम

। पनवेल । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या पनवेल शहराध्यक्षपदी दिलीप कदम यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. दिलीप कदम यांनी आतापर्यंत केलेल्या सामाजिक व राजकीय कामाची दखल वरिष्ठ पातळीवर घेण्यात आली. त्यामुळे त्यांना पनवेल महानगरपालिका शहराध्यक्षपदी नियुक्तीचे पत्र कार्यालयीन चिटणीस देवेंद्र मढवी, चिटणीस प्रकाश म्हात्रे यांच्या माध्यमातून शेकाप नेते माजी आमदार बाळाराम पाटील व इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आले. यावेळी बोलताना, शेकाप वाढविण्यासाठी पूर्णतः प्रयत्न करणार असून तळागळातील लोकांना पक्षाच्या माध्यमातून न्याय मिळवून देवू, असे मत नवनिर्वाचित शहराध्यक्ष दिलीप कदम यांनी व्यक्त केले आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर मधील ३० वर्षीय महिलेला घणसोलीमध्ये राहणाऱ्या व्यक्तीने लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. तसेच, तिच्याकडून तब्बल ६० लाख रुपये उकळून तिची फसवणूक केल्याचा प्रकार देखील घडला आहे. ध्रुव नंदलाल परमार उर्फ पटेल (३४) असे या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणातील पीडित महिला खारघर येथे राहण्यास असून ती हॉटेलमध्ये कामाला आहे. वर्षभरापूर्वी त्याची पीडित महिलेसोबत ओळख झाली होती. लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केले. याशिवाय त्याने तिच्याकडून थोडे-थोडे करत तब्बल ६० लाख रुपये घेतले. पीडित महिलेने ही रक्कम परत मागितली असता, परमार याने तिला तिची रक्कम परत न करता तिची फसवणूक केली. तसेच, त्याने तिच्या नकळत तिचे अशलिल व्हिडिओ काढून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यासोबतच तिला मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच, पीडित महिला गर्भवती राहिल्याने आरोपी परमार याने जबरदस्तीने तिचा गर्भपात करवून घेतला. त्यानुसार खारघर पोलिसांनी आरोपी ध्रुव परमार उर्फ पटेल याच्या विरुद्ध बलात्कार, फसवणूक, मारहाण आणि धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.













कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# बुद्धी दे गणनायका

आज गणेश चतुर्थी. घरोघरी गणपती येतील. दूरदेशी गेलेले घरी येतील. दहा दिवस उत्सव चालेल.आप्तस्वकीय, मित्रांची भेट घडेल. आरत्या होतील. साकडे घातले जाईल. गणपती हा विघ्नहर्ता. त्याची प्रार्थना केली की संकटे दूर होतील अशी आशा लोकांना वाटते. संकटे येण्याचे थांबत नाही. पण देव आपल्यासोबत आहे असा आधार हवासा वाटतो. काही वेळेला अडचणींवर झटक्यात मार्ग निघतो. देवानेच आपल्याला कृपाप्रसाद दिला असे वाटते. काही वेळेला बुडत्याचा पाय खोलात तशी स्थिती होते. देव परीक्षा पाहतो आहे असे वाटते. तरीही देवाची साथ सोडावीशी वाटत नाही. आपले काही चुकले का याचा मनातच आढावा घेतला जातो. माणसे नीट मार्गावर राहतात. गणपती हा म्हटला तर रागिष्ट. चंद्राला त्याने दिलेला शाप सर्वांना ठाऊक आहे. पण तितकाच तो प्रेमळही. लहान मुलांना तो फारच आवडतो. मोदक खाऊन पोट पुढे आले अशी त्याची थट्टाही होते. पण तो मनावर घेत नाही. म्हणूनच घरोघरी त्याला प्रेमाने आणले जाते. हिंदू धर्मामध्ये देव आणि भक्ताचे नाते अजब असते. श्रीविठ्ठल हा एकदम साधासुधा देव. त्याच्यापाशी ना शस्त्र ना अस्त्र. त्याला कधी कोणते नवस केले जात नाहीत. पण दामाजी असो की जनी, या भक्तांच्या मदतीला धावून गेल्याच्या सर्वात जास्त गोष्टी विठ्ठलाच्या नावावर आहेत. या विठ्ठलाला त्याच्या काही भक्तांनी राग येऊन काळतोंड्या वगैरेही म्हटलेले आहे. पण प्रेमातून आलेला तो राग आहे. याच विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेकडो मैलांची वाट तुडवून वारकरी पंढरपुरात जातात. पण नंतर देवळाच्या कळसाचे दर्शन झाले की तिथूनच परत फिरतात. शंकर किंवा महादेव हा भोळा पण तितकाच संतापी मानला जातो. याला साधे पांढरे फूलही वाहिले तर तो प्रसन्न होतो. काय मागाल ते देऊन टाकतो अशी श्रध्दा आहे. श्रीराम हा एक देव असण्यापेक्षा लोकांसाठी राजा आहे. आदर्श असा राजा. त्यामुळे त्याचे पूजन हे आदराने अधिक केले जाते.

## सकल मतिप्रकाशु

याउलट गणपती. हा जवळपास एकमेव असा देव आहे की त्याला आपण दरवर्षी घरी बोलावतो. तो दहा दिवसांसाठी येत असला तरी पाहुणा नसतो. घरातलाच असतो. त्याचा आदरसत्कार करण्यात आपल्याला आनंद होतो. पण गणपती हा संकटमोचक आहे तसाच तो बुद्धीदाताही आहे. देवा तुचि गणेशु, सकल मतिप्रकाशु असे ज्ञानेश्वरांनी म्हणूनच ठेवलेले आहे. पण उत्सवाच्या भरात आणि उत्साहाच्या वातावरणात आपण दिवसेंदिवस ते विसरतो. असे इतरही देवांच्या बाबत होते. श्रीकृष्ण हा आपल्याला खेळगड्यासारखा वाटतो. त्याच्या जन्माचा उत्सव अष्टमीला साजरा करतो. माखनचोर म्हणून त्याची आठवण करतो. त्याच्या नावाने दहीहंड्या फोडतो. पण याच कृष्णाने पुढे जाऊन भगवद्‌गीता सांगितली होती हे विसरून जातो. फळाच्या भावनेने कर्म करू नका हा त्याचा उपदेश नजरेआड करतो. तसेच गणपतीबाबतही होते. हा आपल्या घरच्यासारखा वाटतो. त्याच्या आरत्या आपण गातो. पण तो बुद्धीदायक आहे हे आपण काही काळ जणू विसरून जातो. त्याच्या नावाने सर्वात खर्चिक, सर्वात जास्त आवाजाचे, प्रदूषणाचे असे उत्सव करतो. दरवर्षी खर्चाचे आकडे आणखी आणखी वाढवत नेतो. घरोघरी होणारी फुलांची सजावट, आरास हे त्याचे खरे वैभव असते. पण आपण अधिकाधिक झगमगाट, उघडझाप करणारे दिवे, प्रचंड उंचीचे देखावे यासाठी तडफडतो. यालाच खरी भक्ती मानतो. मंडळे काढतो. लाखोंच्या देणग्या गोळ्या करतो. त्यासाठी धमक्या देतो. मंडळांचे कार्यकर्ते म्हणून एकमेकांशी मारामाऱ्या करतो. हे सर्व त्या बुद्धीदायकाच्या नावाने करतो. आपण जे करतो त्याने तो खूष होईल असे आपल्याला का वाटते हे ठाऊक नाही. पण वाटते खरे. शिवाय, बुद्धी ही पाच किंवा दहा दिवस नव्हे तर वर्षाचे बाराही महिने वापरण्याची गोष्ट आहे हेही आपल्या लक्षात राहत नाही. उदाहरणार्थ, महाराष्ट्राच्या एका मंत्र्यांनी कालपरवा वराह जयंती नावाचा नवीन प्रकार सुरू केला. वराह म्हणजे डुक्कर. श्रीविष्णूचा हा तिसरा अवतार. पण म्हणून आजवर त्याची कोणी पूजा करीत नव्हते.

## नीच बुद्धीचा नायनाट व्हावा

गणराय हाही आपला लाडका देव. त्याचे वाहन असलेला उंदीर हाही त्याच्या मूर्तीसोबत असतोच. पण म्हणून या उंदराची आणि आणि प्रत्यक्षातल्या उंदराची कोणी पूजा करीत नाही. उंदीर हा किती नुकसान करतो हे हरेक शेतकरी जाणतो. त्यामुळे त्याचा नायनाटच केला जातो. त्यासाठी रीतसर औषधे, सापळे सर्व काही वापरतो. डुक्कर या प्राण्याचेही तेच आहे. शेतीचे मोठे नुकसान करणारी ही जमात आहे. शिवाय, रानावनात फिरताना माणसावर यांचा हल्ला होण्याचीही भीती असतेच. त्यामुळे डुकरांचा बंदोबस्त करण्याची सतत मागणी होते. त्यासाठी बंदुकांना व त्यांच्या शिकारींना परवानगी देण्याची मागणी होते. ती मिळाली नाही तरीही पूर्वापार कोकणातील अनेक गावात डुकरांची शिकार करून ती वाजतगाजत आणली जाते. त्याच्या मटणाचे गावजेवण होते. आता हे मंत्रीही कोकणातलेच आहेत. यांचे वडील स्वतःला कोकणाचे सुपुत्र म्हणवतात. तरीही हे मंत्रीमहोदय वराह उर्फ डुकराची जयंती साजरी करू पाहत आहेत. हिंदू धर्मातला हा मोठा सण असल्याचा साक्षात्कार त्यांना झाला आहे. परवा वराहाची आरती करतानाचे व्हिडिओ सर्वत्र प्रसारित झाले. ही आरती कोणती होती आणि पूजेचे मंत्र काय होते हे त्यांनी जाहीर करायला हवे. गणपतीच्या भक्तांच्या देशात वराहाची पूजा करण्याचा हा निर्बुद्धपणा वाढीस लागावा ही चिंतेची बाब आहे. डुक्कर हा मुस्लिमांसाठी अत्यंत निषिद्ध असा प्राणी आहे. त्यांना डिवचण्यासाठीच या मंत्र्यांनी बहुदा हा पूजेचा घाट घातला असावा असे म्हणतात. हा तर नीच बुद्धीचा नमुना म्हणायला हवा. गणनायकाला आपण सुबुद्धी म्हणजेच चांगली बुद्धी दे असे साकडे घालतो. हे असले मंत्री आणि त्यांचे गणंग साथी यांना चांगली बुद्धी दे, नाहीतर यांना आपल्यासोबत घेऊन जा व त्यांचे प्रबोधन कर असे साकडे यापुढे घालावे लागेल. दुर्दैवाने असले नीच बुद्धीचे प्रकार आपल्याकडे वाढत चालले आहेत. कालपरवा एका किरकोळ विनोदी अभिनेत्याने एक व्हिडिओ सोशल मिडियात टाकला. त्यात गणपतीची मूर्ती बनवणारा मुस्लिम असल्याचे दाखवले. तरीही त्याच्याकडून मूर्ती घेण्यात काही अडचण असता कामा नये असा संदेश दिला. त्याच्या या चांगल्या संदेशावर काही नीच बुध्दीच्या इसमांनी आक्षेप घेतला. मुसलमान मूर्तीकार हा हिंदूंचा अपमान वगैरे भाषा झाली. ही सर्व कुबुध्दीची लागण गेल्या दहा वर्षात वाढली आहे. यावर काहीतरी जालीम इलाज करा अशी प्रार्थना आता गणरायाच्या चरणी करण्याची वेळ आली आहे. गणनायका यांना सुबुद्धी द्या.

विचार

# विघ्ने आहेत, पण विघ्नहर्ताही येतोय

*गणेशोत्सवाच्या लगबगीने सध्याच्या भारलेल्या वातावरणाला देशातंर्गत आणि जागतिक पातळीवरील अनेक महत्त्वपूर्ण घडामोडींची पार्श्वभूमी आहे. विघ्नहर्त्याचे स्वागत करताना सध्या आपण अमेरिकेकडून खेळल्या जाणाऱ्या आर्थिक युद्धनीतीच्या विघ्नाचा सामना करत आहोत. शेजारी देशांशी संघर्ष निवळला असला तरी ताण कायम आहे. तेव्हा आपणही आयुधांनी सिद्ध आहोत. त्याला गणरायाने बळ पुरवावे हीच कामना.*



**मंजिरी ढेरे**

गणेशोत्सव जवळ आला की घरांमध्येच नव्हे तर संपूर्ण समाजातही एक प्रकारचे चैतन्य अनुभवायला मिळते. रोजच्या व्याप-तापातून बाहेर पडत लोक या उत्सवाच्या तयारीत रमतात. कामधंद्यासाठी गावाबाहेर पडलेले लोक हमखास गावी परतत कुटुंबासवे गणपतीचा सण आनंदात आणि घरगुती वातावरणात साजरा करतात. एक प्रकारे आजूबाजूला बऱ्याच अडचणी असल्या आणि त्यातून वाट काढत तारेवरची कसरत रोजची असली तरी ती करण्यासाठी नवे बळ, ऊर्जा देणारा सण म्हणून आपण गणेशोत्सवाकडे बघू शकतो. सध्याही देशात आणि जगात सगळे आलबोल आहे, अशातला भाग नाही. मुसळधार बरसलेल्या पावसाने काही भागातील पीक पाण्याखाली गेले आहे तर काही ठिकाणी पुरेसा पाऊस नसल्याने शेतकरी त्रासले आहेत. जगातील वाढता युद्धज्वर, अमेरिकेच्या अध्यक्षांचा आडमुठेपणा आणि अवाजवी आयात शुल्क आकारणे, अन्य देशांमध्ये सुरू असणारे सत्तासंघर्ष, अस्वस्थ शेजारी हे आणि यासारखे असंख्य विषय रोजच्या जगण्यावर कळत-नकळत परिणाम करत आहेत. मात्र अशाने श्रमून, थकून न जाता जगण्याला नव्या उमेदीने आणि आत्मविश्वासाने सामोरे जायचे असेल तर सणावारांच्या रुपाने मिळणारे टॉनिक घेणे हा उत्तम उपाय ठरतो. तेव्हा केवळ आध्यात्मिक आणि सामाजिक अंगानेच नव्हे तर मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टीनेही येणाऱ्या गणेशोत्सवाकडे पाहू या आणि त्याचा आनंद घेऊ या.

शास्त्राप्रमाणे बघायचे तर भाद्रपद शुक्ल चतुर्थीला मध्यान्ह कालव्यापिनी असेल त्या दिवशी श्री गणेशाचे पूजन करण्यास सांगितले आहे. यावेळी श्री गणेशाची मूर्ती ही शाडूची, मातीची असावी असेही सांगण्यात आले आहे. पार्थिव म्हणून पृथ्वीपासून निर्माण झालेली. गणपती हा सुखकारक आणि दुःखहारक आहे. समाजात बंधूभाव वाढीस लागावा, गरिब-श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित, उच्च-नीच हे सारे भेद दूर व्हावेत आणि एकोप्याचे दर्शन व्हावे या हेतूने दर वर्षी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जातो. या काळात विविध धार्मिक, सामाजिक उपक्रम राबवले जातात, कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न होतो. म्हणूनच प्रत्येकजण आतुरतेने गणेशोत्सवाची वाट पाहत असतो. हा उत्सव साजरा करण्यासाठी सारेजण प्रयत्नशील असतात. परिस्थिती कशीही असली तरी श्री गणेशाचे पूजन मनोभावे, आनंदाने, समाधानाने केले जाते. साधारणपणे दर वर्षी गणेशोत्सव आधीच्या वर्षापेक्षा ११ दिवस आधी येतो. अशा पद्धतीने तिसऱ्या वर्षी गणेशोत्सव ३३ दिवस आधी येतो आणि त्या वर्षी अधिक महिना असतो.

ईश्वराला केवळ भक्तांनी मनापासून केलेल्या भक्तीची आस असते. बाकी त्याची काहीच अपेक्षा नसते. त्यानुसार श्री गणेशालाही मनोभावे सेवा करणारे भक्तगण आवडतात. असे असले तरी गणेशमूर्ती आणि पूजेबाबत काही गैरसमज आढळतात. कोणताही देव कडक किंवा सौम्य नसतो. तो कृपाळू आणि प्रेमळ असतो आणि देव कधी कोणाचे वाईट करत नाही. त्यामुळे उजव्या सोंडेचा गणपती कडक असतो हा समज चुकीचा ठरतो. गणपतीच्या डाव्या हातात मोदक असतो. म्हणून त्याची सोंड डावीकडे असते. गणेशोत्सवाच्या काळात कोणाकडे दहा दिवसाचा गणपती असतो तर कोणाकडे दीड, तीन किंवा पाच दिवसांचा असतो. त्यामुळे गणपती किती दिवसांचा असावा असाही प्रश्न बरेचदा विचारला जातो. वास्तविक, गणेश चतुर्थीच्या दिवशी नदीकाठी जाऊन, तेथील मातीची श्री गणेशाची मूर्ती तयार करून, यथासांग पूजा करून नदीत विसर्जन करायचे असते. दक्षिण भारतात अजुनही बहुतांश ठिकाणी गणेश चतुर्थीच्या दिवशीच श्री गणेशमूर्तीचे विसर्जन केले जाते. आणखी एक बाब म्हणजे एखाद्या घरात पाच दिवस गणेशपूजन होत असेल आणि त्या घरातील व्यक्तींची दीड दिवसाच्या गणेश पूजनाची इच्छा असेल तर त्यासाठी शास्त्राची कोणतीही हरकत नाही. अलिकडे श्री गणेशाच्या मूर्तीसाठी वेगवेगळ्या आकारातील मुखवटे बनवण्यावर भर दिला जातो. म्हणजे या मुर्तीला अन्य देवतेचे किंवा मनुष्याचे मुखवटे असतात. परंतु गणेशोत्सवातील गणेशमूर्ती ही श्री गणेशाचीच असावी. त्याला दुसऱ्या कोणाचा मुखवटा असता कामा नये. कारण आपण गणेशोत्सव काळात ठराविक दिवशी श्री गणेशमूर्तीचेच विसर्जन करत असतो हे लक्षात घ्यायला हवे. श्री गणेशाची प्रतिष्ठापना करताना त्याचे तोंड पूर्व-पश्चिम असावे. असे करणे अगदीच अशक्य असेल तर अन्य दिशेला तोंड असणेही चालू शकेल. श्रीगणेशाला मोदक आणि लाडू विशेष प्रिय आहेत. त्यामुळे त्याला नेहमी मोदकांचा किंवा लाडवांचा प्रसाद दाखवला जातो. अर्थात, आपल्याला आवडेल तो आणि जमेल तो प्रसाद श्री गणेशासमोर ठेवणेही तितकेच महत्त्वाचे ठरते. इथे आणखी एक रंजक माहिती पुढे येते. संस्कृतमध्ये आखू या शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक म्हणजे मायाभ्रम आणि दुसरा म्हणजे उंदीर. यातील उंदीर हे गणपतीचे वाहन आहे. म्हणजे विश्वाच्या भ्रामक पसाऱ्यावर गणपती आरूढ झाला आहे किंवा उंदरावर बसून गणपतीने दमन करून त्याला नियंत्रणात ठेवले आहे असाही अर्थ निघतो.

विनायक, गुणेश, गणेश आणि धुम्रकेतू असे गणपतीचे चार अवतार मानले जातात. गणपतीला दुर्वा, शमी आणि मंदार या वनस्पती अधिक प्रिय आहेत. तसेच श्री गणेशाच्या पूजेमध्ये अनेक आयुर्वेदिक औषधी वनस्पतींचा वापर केला जातो. गणपती हा १४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती आहे. गणपती हा रंगभूमीचा नटेश्वर आहे, तो रणांगणात लढणारा योध्दा आहे, तो गणांचा अधिपती आहे. गणपती राजकारणपटू आहे, तो विघ्नहर्ता, दुःखहर्ता आणि सुखकर्ता आहे. कोणत्याही दैवताची पूजा केल्याने त्या दैवतात बदल होत नसतो तर पूजा करणाऱ्याच्या ठायी बदल होणे अपेक्षित असते. त्या दृष्टीने श्री गणेशाचे पूजन करताना आपल्यातील दुर्गुण नष्ट करून सगुणांची जोपासना करण्याचा निश्चय केला जायला हवा. गणपती हा बुध्दीदाता आहे. तरिही फक्त श्री गणेशाची पूजा करून बुध्दी प्राप्त होणार नाही. त्यासाठी मेहनत आणि प्रयत्न यांची आवश्यकता आहे. गणपतीचे मोठे डोके हे प्रगल्भ बुध्दीमत्ता सूचित करते. गणपतीचे मोठे कान सर्व काही शांतपणे ऐकून घ्या, असा संदेश देतात. गणपतीचे बारिक डोळे सूक्ष्म निरिक्षण करा असे सांगतात. गणपतीची लांब सोंड ही दूरदृष्टीचे दर्शन घडवते. पुढे घडणाऱ्या घटना श्री गणेशाला अगोदर समजतात. गणपतीचे चार हात हे 'अधिक काम करा' असा संदेश देतात. गणपतीचे मोठे पोट इतरांचे अपराध पोटात घालून त्यांना क्षमा करा असे सांगते. सध्याच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या आणि आधुनिक युगात संगणकाचा वापर सामान्य झाला आहे. संगणक न वापरणारा सापडणे दुर्मिळ अशी परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर गणपती आणि संगणक यातील साम्य लक्षात घ्यायला हवे. गणपती आणि संगणक या दोघांचीही मेमरी शार्प आहे. हे दोघेही गणितज्ज्ञ आहेत. गणपतीपुढे २१ मोदक असतात तर संगणकापुढे की बोर्ड असतो. महत्त्वाची बाब म्हणजे या दोघांनाही माऊसची (उंदराची) आवश्यकता असते. आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञान-विज्ञानाचा अधिपती श्री गणेश हा मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होत आहे.

'तुला यज्ञयागात, वेदशास्त्र स्तवनात, नित्य पूजा विधानात अग्रक्रम मिळेल' असा वर पार्वतीने गणपतीला दिला. म्हणूनच प्रत्येक शुभकार्याची सुरूवात श्री गणेश पूजनाने केली जाते. बदलत्या काळानुरूप गणेशोत्सवाचे स्वरूप बदलत चालले आहे. त्याला अधिक भव्य, आकर्षक स्वरूप देण्याचा प्रयत्न आवर्जून केला जात आहे. भव्य देखावे, नेत्रदीपक रोषणाई, दिमाखदार मिरवणूक या बाबींवर लाखो रूपये खर्च केले जात आहेत. परंतु या उत्सवात सामाजिक जाणिवांचे भान राखले जाण्याची आवश्यकता आहे. समाजातील गरजूंना योग्य ती मदत देण्याचा विधायक उपक्रम अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे सध्याच्या वाढत्या महागाईच्या आणि असुरक्षिततेच्या जमान्यात प्रत्येकालाच जगण्याची रोजची लढाई लढावी लागत आहे. अशा वेळी आपणही या समाजाचे घटक आहोत, त्यांच्यासाठी काही करायला हवे ही सततची जाणीव महत्त्वाची ठरते. या पार्श्वभूमीवर वाढत्या दहशतवादी कारवाया, जागतिक पातळीवरील तणावस्थिती, भडकलेल्या व्यापारयुद्धाने होणारा त्रास, महागाई या साऱ्या समस्या दूर व्हाव्यात आणि सर्व जनता सुखी-समाधानी व्हावी हीच श्री गणेशाच्या चरणी प्रार्थना.

चर्चा आजची

# गणेशभक्तांची पंढरी सजली



**संतोष राऊळ**

वर्षभर ज्या दिवसाची आतुरता होती, अखेर तो दिवस उजाडलाच. सर्व गणेशभक्त 'झाले पुरे एक वर्ष, होतो वर्षाने एकदाच हर्ष' गाणं गुणगुणतं आपला आनंद व्यक्त करत आहेत. प्रत्येक जण एक एक दिवस मोजत होता. आणि अखेर तो दिवस उजाडलाच. आज घरोघरी, सार्वजनिक ठिकाणी बाप्पाचे खऱ्या अर्थाने आगमन होत आहे. त्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गणेशभक्तांची पंढरी म्हणजेच मुंबापुरी देखील सजली आहे. मुंबईतील लालबाग-परळ म्हणजे गणेशभक्तांची पंढरीच. देशभरातून हजारो भक्त या दहा दिवसांत मुंबईतील बाप्पांचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. या दहा दिवसांतच घराला घरपण आणि मुंबईला देवपण प्राप्त होतं.

खरंतर गणेशोत्सवाची चाहूल दोन-तीन महिन्यांपूर्वीपासूनच होते. काही मोठ्या सार्वजनिक मंडळात तर बाप्पाचे विसर्जन झाल्यावर पुढल्या वर्षीचे नियोजन सुरू होते. बाप्पाच्या मुर्तीपासून ते सजावट आणि इतर उपयुक्त गोष्टींचे नियोजन करण्यात येते. सार्वजनिक गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी पुण्यात सुरू केला. मात्र, त्याचा मोठ्या प्रमाणात गाजावाजा हा मुंबईत होत आहे. मुंबईतील १०० वर्षे पुर्ण केलेली जी मंडळ आहेत त्यांनी लोकमान्य टिळकांच्याच प्रेरणेने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केले. तो काळ आणि आजचा दिवस यांत खुप फरक आहे. त्याकाळी बाप्पाची एखादी छोटी मुर्ती जरी बसवायची झाली तरी जितकी वर्गणी गोळा होईल त्यावर बाप्पाची मुर्ती आणि इतर गोष्टींचा विचार केला जायचा. मात्र, आता तसे नाही. आता बाप्पाची मुर्ती आणि इतर गोष्टी आधी ठरवतात आणि त्या हिशोबाने वर्गणी गोळा केली जाते. विशेष म्हणजे त्या काळच्या गणेशोत्सवाने आज प्रचंड मोठी उंची गाठली आहे. बाप्पाच्या मुर्तीसह मंडळांची उंची देखील वाढलीच, मात्र आपला हा मराठमोळा सण संपुर्ण जगभरात पोहोचला. या सणाला महाराष्ट्र राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे या सणाने आता तर खुप मोठी उंची गाठली आहे.

गणेशोत्सवापूर्वी दोन-तीन महिन्यांआधीच गणेशभक्तांची पंढरी म्हणजेच मुंबापूरी बाप्पाच्या आगमनासाठी सजत होती. ऑगस्ट महिन्याच्या सुरूवातीपासूनच बाप्पाचे आगमन सुरू झाले होते. यंदा मुंबईतील प्रत्येक मंडळाकडून काहीतरी विशेष करण्याचा प्रयत्न दिसून आला आहे. प्रत्येक मंडळाने बाप्पाची मूर्ती घडविताना खुप विचार केला आहे. बाप्पाची मूर्ती किती मोठी असावी आणि कशी असावी. विशेष कौतूक त्यांचं जे बाप्पाची मूर्ती घडवितात. ज्याने आपल्याला घडवलं त्याला आपण घडवतोय, अशी भावना नक्कीच त्यांच्या मनांत येत असणार. जसं छोट्या मूर्तींसाठी पेण हे माहेरघर आहे. तसेच, मोठ्या आणि उंच मूर्तींसाठी मुंबईतील परळ हे माहेरघर आहे. या ठिकाणी पाच-दहा फुटापासून ते चाळीस फुटापर्यंत मूर्ती घडविल्या जातात. इथे पाच फुटाची मुर्ती सांभाळताना आपण प्रचंड काळजीत पडतो. मात्र, मुंबई सारख्या शहरात अशा चाळीस फुटापर्यंतच्या मूर्ती सांभाळणं आणि त्याही काळजीपूर्वक दुरवर प्रवास करत नेणं, हे मोठ्या जिकरीचं काम आहे. त्याचंच नियोजन वर्षभर सुरू असतं. बघायला गेलं तर बाप्पा सगळीकडे सारखाच असतो. एका बाप्पाचं दर्शन घेतलं काय आणि शेकडो बाप्पांचं दर्शन घेतलं काय, एकचं. तरी देखील मुंबईत गणेशोत्सवाला एवढी गर्दी का? आषाढी एकादशीच्या दिवसांत जशी पंढरी सजते तशीच मुंबई या दहा दिवसांसाठी सजते. त्याला कारण म्हणजे बाप्पाच्या वेगवेगळ्या रूपातील मूर्ती. ती फक्त मूर्ती नसून मूर्तीकाराने आपला प्राण त्यात फुकलेला असतो. बाप्पा आपल्याजवळच असतो पण मुंबईत मूर्तीकाराची जीवंत कला पाहण्यासाठी हजारो भक्तगण जात असतात. काही बाप्पांच्या मूर्तींचे अपवाद वगळता इतर बाप्पांच्या मूर्ती या अप्रतिम असतात. आपण विचारही नाही करू शकत की हि मूर्ती बनवली कशी असेल. हल्लीच्या काळात बाप्पाचे आगमन झाले की लगेच सोशल मिडीयावर बाप्पाचे रूप दिसते. मात्र, असे असले तरी प्रत्यक्षात त्या ठिकाणी जाऊन मूर्तीकाराची जीवंत कला पाहण्याची आणि आपल्या डोळ्यांत कायमची कैद करून ठेवण्याची गोष्टच वेगळी असते. त्यासाठीच प्रत्येक गणेशभक्तांचा बाप्पाचे वेगवेगळे रूप पाहण्याचा संकल्प असतो. त्यासाठीच तो गणेशोत्सवाच्या दिवसांत अखंड मुंबईभर पायपीट करत असतो. म्हणूनच मुंबईला गणेशभक्तांची पंढरी म्हटले जाते. ही देखील त्याच्यासाठी वारीच आहे.

आजपासून गणेशोत्सवाला सुरूवात होत आहे. घरोघरी आणि सार्वजनिक ठिकाणी बाप्पा विराजमान होऊन त्यांना मनोभावे पुजले जात आहे. बाप्पाची कृपा सर्वांवर अशीच निरंतर राहो, हिच बाप्पा चरणी प्रार्थना.

गणपती बाप्पा मोरया....

दिनविशेष

# श्री गणेश चतुर्थी

भगवान गणेश हे हिंदू धर्मातील प्रथम पूज्य देव मानले जातात. कोणतेही शुभ कार्य करण्याच्यापूर्वी त्यांचे नाव घेतले जाते. त्यांचे नाव घेतल्याशिवाय कोणतेही कार्य सुरळीत पद्धतीने पूर्ण होऊ शकत नाही. हिंदू पौराणिक कथेनुसार देव गणेश हा भगवान शिव आणि देवी पार्वतीचा पुत्र असल्याचे मानले जाते. गणेश चतुर्थी हा दिवस गणपतीच्या जन्माचा उत्सव आहे. पुराणानुसार देवी पार्वतीने अपत्य प्राप्तीसाठी पुण्यक नावाचे व्रत कैवल्य केले असे. या उपवासामुळे आई पार्वतीस श्री गणेश पुत्र रूपात प्राप्त झाले. या उपवासासाठी शिवने इंद्रास पारिजातक वृक्ष देण्यास सांगितले पण इंद्राने पारिजातक वृक्ष देण्यास नकार दिले तेव्हा त्यांनी पार्वतीच्या व्रत कैवल्यासाठी पारिजातकाच्या वनांची बांधणी केली. शिव महापुराणानुसार आई पार्वतीला गणेशाला बनविण्याची कल्पना त्यांचा सखी जया आणि विजया कडून मिळाली. त्यांचा सखींनी पार्वतीला सांगितले की नंदी आणि इतर गण फक्त महादेवाच्या आज्ञेचे पालन करतात म्हणून आपण देखील एक असा गण तयार करावा, जो फक्त तुमच्याच आज्ञेचे पालन करेल. या कल्पनेने प्रभावित होऊन देवी पार्वतीने आपल्या मळीपासून गणेशाची निर्मिती केली. त्यामागची कथा निश्चितपणे तुम्ही ऐकली असेल. पौराणिक कथेनुसार या दिवशी माता पार्वतीने स्नानासाठी जात असताना आपल्या अंगावरील मळापासून एक लहानशा मुलाची मूर्ती तयार करून, त्यात प्राण टाकले होते. मग देवी पार्वती आपले स्नान होईपर्यंत आपल्या कक्षाबाहेर पहारा देण्यास या लहान मुलाला सांगते आणि कोणालाही आत प्रवेश न देण्याची सूचना देते. त्याप्रमाणे हा मुलगा आपल्या मातेच्या आज्ञेचे पालन करतो आणि कक्षाबाहेर पहारा देत असतो. त्याच वेळी महादेव देवी पार्वतीला भेटण्यासाठी तिथे येतात. त्या क्षणी गणेश आणि महादेव दोघेही एकमेकांना ओळखत नसतात. त्यामुळे तो लहान मुलगा महादेवांना माता पार्वतीच्या कक्षात प्रवेश करण्यास मनाई करतो. महादेवदेखील ते मान्य करीत नाहीत आणि हा लहान मुलगाही मागे हटत नाही. त्यामुळे महादेवांना राग अनावर होतो आणि दोघांमधील वाद टोकाला जातो. मग शंकर आपल्या त्रिशूळाने त्या मुलाचे शिर धडापासून वेगळे करतता. तोपर्यंत माता पार्वती स्नान आटोपून बाहेर येते आणि आपल्या मुलाची अशी अवस्था पाहून अत्यंत दुःखी व संतप्त होते.

आपल्या मुलाला पुन्हा जिवंत करण्याचा हट्ट ती भगवान शंकराकडे धरते. त्यावेळी भगवान शंकर त्याच्या देवतांना उत्तर दिशेला सर्वांत पहिल्यांदा जो प्राणी दिसेल त्याचे डोके आणण्यास सांगतात. त्यानुसार देवतांना हत्तीचे डोके सापडते. अखेर भगवान शंकर ते हत्तीचे डोके त्या लहान मुलाच्या धडाला जोडतात आणि श्रीगणेशाचा जन्म होतो, अशी ही कथा आहे.

लोकसंसद

## चाकरमानी नव्हे कोकणवासी

कोकणातून शहरात विशेषतः पुण्या - मुंबईसारख्या मोठ्या शहरात नोकरी करण्यासाठी गेलेल्या लोकांना यापुढे चाकरमानी नव्हे तर कोकणवासी म्हंटले जाणार आहे. या संदर्भात सरकारकडून अधिकृत परिपत्रक लवकरच जाहीर होणार असल्याची बातमी वाचली. सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. चाकरमानी पेक्षा कोकणवासी हे संबोधन योग्य वाटते. कोकणातून अनेक तरुण रोजगारासाठी पुण्या - मुंबईसारख्या मोठ्या शहरात गेले तिथे ते मिळेल ती नोकरी करू लागले. विशेषतः मुंबईच्या कापड गिरण्यांमध्ये अनेक कोकणी तरुण नोकरी करू लागले. नोकरीचा समानार्थी शब्द चाकरी असा आहे. मुंबईत मानाने चाकरी (नोकरी) करणारे म्हणून चाकरमानी हा शब्द रूढ झाला. आता मात्र परिस्थिती बदलली आहे. कोकणातले तरुण शहरात फक्त नोकरीसाठी जात नाही. अनेक कोकणवासीयांचे शहरात उद्योगधंदे आहेत. पूर्वी नोकरी करणारे आता नोकरी देणारे झाले आहेत त्यामुळे सध्याच्या काळात चाकरमानी हे संबोधन योग्य वाटत नाही. शिवाय या संबोधनात एकप्रकारे गुलामीची छटा जाणवते. काहींना हे संबोधन अवमानकारकही वाटते. याउलट कोकणवासी हे संबोधन सन्मानजनक वाटते त्यामुळेच कोकणवासी या संबोधनाचे सर्वत्र स्वागत होत आहे. ऐन गणेशोत्सवात हा निर्णय घेऊन सरकारने कोकणवासीयांचा सन्मान जपला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**- श्याम ठाणेदार, ठाणे**

## गणपती बाप्पाचे वैश्विक रूप

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या लाडक्या गणपती बाप्पांचे आज घरोघरी आगमन होत आहे. चैतन्याच्या आणि आनंदाच्या या मराठी मनाच्या महाउत्सवात गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण आले आहे. गणपती हा चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा अधिपती मानला जातो. बुद्धीच्या या देवाची सर्वत्र मनोभावे पूजा केली जाते. गणेशोत्सवात घराघरात प्रसाद आणि मिठाईचा सुगंध दरवळतो आणि वातावरण अधिकच भक्तिमय होऊन जाते. आपल्या देशातील विविध भागात गणेशोत्सव साजरा होत असला तरी महाराष्ट्रात या उत्सवात सर्वाधिक उत्साह ओसंडून वाहत असतो. जगभरात विविध देशात नोकरी, व्यवसायानिमित्त गेलेली मराठी माणसे एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करतात. त्यासाठी आपल्या 'पेण'च्या मूर्तिकारांनी घडवलेल्या बाप्पाच्या सुबक आणि सुंदर मूर्ती परदेशात पाठविल्या जातात. जगातील अफगाणिस्तान, व्हिएतनाम, थायलंड, कंबोडिया, मलेशिया, इंडोनेशिया, लाओस, नेपाळ, बांगला देश, म्यानमार, श्रीलंका अशा अनेक देशांमध्ये गणपतीच्या संगमरवरी, पाषाणाच्या, धातूंच्या, काष्ठाच्या स्वरूपात मूर्ती आढळून आल्या आहेत. विशेष म्हणजे जगातली गणपतीची सगळ्यात मोठी ३९ मीटर उंच गणपतीची कांस्याची मूर्ती थायलंडच्या चाचोएंगसाओ प्रांतातील ख्लॉन्ग ख्वान्ग शहरामध्ये स्थित आहे. यावरून गणपती बाप्पाचे वैश्विक रूप दिसून येते. चला, सामाजिक सुरक्षा आणि पर्यावरणाचे भान राखत 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात यंदाचा गणेशोत्सव उत्साहाने आणि आनंदाने साजरा करूया.



**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## निवडक



### खरेदीसाठी गणेशभक्तांची गर्दी

**आगरदांडा :** श्री गणेशोत्सव उद्या २७ ऑगस्टला येत असुन गणपतीच्या मखाराजवळ बांधण्याकरिता आवश्यक असणारा कवडाळ, पिंगवी फळ व ओवसा करीता लागणारी सुप मुरुड बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झाले आहेत. ही फळे जंगलभागात मिळत असल्याने आदिवासी महिलांना या फळांच्या माध्यमातून चांगला व्यवसाय मिळत आहे. फळे खरेदीसाठी गणेशभक्तांची गर्दी बाजारपेठेत पाहायला मिळत होती. गणेशोत्सवा करीता कवडाळ, पिंगवी, पपनीस अशी विविध फळ तसेच केवडा, दुर्वा घेऊन महिला बाजारात आणून विक्री करत होत्या.



### कड्यावरचा गणपतीचे रंगकाम

**नेरळ :** कर्जत तालुक्यात तलवडे येथे सुबक आणि सुंदर मूर्ती घडविणारे मूर्तिकार सोपान खाडे हे माथेरान येथील प्रसिद्ध कड्यावरचा गणपती यांचे रंगकाम करणारे म्हणून ओळखले जातात. त्यांच्या गणेशमूर्ती कारखान्यात घडवणारे मूर्तिकार सोपान खाडे यांच्याकडे आकर्षक रंग संगती म्हणून भक्तांची गर्दी होत असते. भाद्रपद महिन्यात गणेश चतुर्थीसाठी तलवडे येथे सुंदर आणि कोरीव काम केलेल्या सुंदर गणेशमूर्ती घडविण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे त्यांच्याकडे तालुक्यातील अनेक गावातून गणेशमूर्ती नेण्यासाठी येत असतात जास्त संख्येने गणेशमूर्ती त्यांच्या तलवडे, वंजारपाडा, अंथरड दहिवली, पोशीर, अशा तालुक्यातील अनेक गावांमध्ये गणेशमूर्ती पूजनासाठी घेऊन जात असतात. खाडे यांनी १४ वर्षे मेहनत घेत मूर्ती साकारण्याचे काम केले आणि तेथे बाप्पा कड्यावरचा गणपती म्हणून प्रसिद्ध झाले.




### तळा बसस्थानकातून एसटी सुरू

**तळा :** जवळपास दोन महिन्यांच्या कालावधी नंतर तळा बसस्थानकातून एसटीची वाहतूक सुरू झाल्याने प्रवाशांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.गेल्या दोन महिन्यांपासून तळा बसस्थानकाचे काम सुरू असल्याने सर्व बसेस मांदाड रस्त्यावर लागत होत्या.यामुळे प्रवाशांना बाजारात येणासाठी मोठी चढण चढून यावे लागत होते. तसेच बाजारात खरेदी केलेल्या साहित्याचे ओझे घेऊन पुन्हा तेवढच अंतर चालत जाऊन बस गाठावी लागत होती.बऱ्याचदा अंतर लांब पडत असल्याने प्रवाशांना वेळेत एसटी पकडणे शक्य होत नव्हते. गणेशोत्सव अवघ्या तीन दिवसांवर येऊन ठेपला असल्याने मोठ्या प्रमाणावर चाकरमानी गावी दाखल होणार आहेत. त्यामुळे तळा बसस्थानकाच्या काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण करून गणेशोत्सवापूर्वी बस स्थानकात आणाव्यात अशी मागणी येथील व्यापारी व प्रवासी वर्गाकडून करण्यात येत होती त्यानुसार संबंधित ठेकेदाराकडून काँक्रीटीकरणाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आल्याने शनिवार पासून तळा बसस्थानकातून एसटीची वाहतूक सुरू करण्यात आली. यामुळे मुंबईकर चाकरमान्यांसह प्रवासी वर्गाला मोठा दिलासा मिळाला असून गणेशोत्सवापूर्वी तळा बसस्थानकातून एसटीची वाहतूक सुरू करण्यात आल्याने येथील व्यापाऱ्यांसह प्रवासी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### गणेशोत्सवावर पावसाचे सावट

**रोहा :** मुंबईसह कोकणात पुन्हा एकदा पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. चार दिवसांची उसंत घेतलेल्या पावसाने शनिवार रायगड जिल्ह्यात मुसळधार बॅटिंग सुरू केली असून सकाळपासूनच पाऊस कोसळत आहेत. त्यामुळे अनेक



ठिकाणी पाणी साचल्याने आणि दृश्यता कमी झाल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम होत आहे. विशेषतः गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हा पाऊस मुंबईकरांसाठी आणि गावी जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. दरम्यान, गणेशोत्सवाचाच्या अनुषंगाने लाखों मुंबईकर मुंबई-गोवा महामार्गावरून आपल्या गावी असताना पावसाने अचानक हजेरी लावल्यामुळे महामार्गावर वाहतूकीवर परिणाम झाल्याचे चित्र दिसत आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• जन्नावार हॉस्पिटल अलिबाग मध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# इको फ्रेंडली मखरांना भाविकांची पसंती

## थ्रीडी व मेटल थीमना चलती, बाजारपेठा सजल्या, कोट्यावधींची उलाढाल

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

**गणेशोत्सवात गणरायाच्या आरास, मखर व सजावटीच्या साहित्याने जिल्ह्यातील बाजारपेठ सजल्या आहेत. यामध्ये आकर्षक पर्यावरणस्नेही मखरांना मागणी वाढली आहे. विविध थीममध्ये व थ्रीडी प्रकारात देखील मखर उपलब्ध आहेत. केवळ मखर विक्री व बनवण्यात जिल्ह्यात करोडो रुपयांची उलाढाल होते.**



अनेक सजग व पर्यावरणप्रेमी व्यावसायिक, कलाकार, कारागिरांनी इको फ्रेंडली मखर बनवले आहेत. तसेच विक्रीसाठी ठेवले आहेत. प्लास्टिक मुक्तिसाठी हे पर्यावरणस्नेही मखर खुपच सहाय्यक ठरत आहेत. विशेष म्हणजे आकर्षक आकार, प्रकार, स्वस्त व टिकाऊ अशा स्वरूपाचे हे पर्यावरणस्नेही मखर असून अनेक नागरिक ते घेण्याला पसंती देत आहेत. प्लास्टिक व थर्मोकोल बंदीच्या निर्णयामुळे इकोफ्रेंडली वस्तुंना मागणी वाढली आहे. थर्माकोलच्या मखरांना पर्याय देण्यासाठी व पर्यावरण संवर्धनासाठी अत्यल्प नफा कमवून विक्रेते व कारागीर पुठ्ठ्याचे व कापडी मखर बनविने व विक्री व्यवसाय करत आहेत.

### पर्यावरण पूरक मखर

पुठ्ठा किंवा सन बोर्ड किंवा प्लायवूड, मखमली व जरीचे कापड, गादीचा फोम, कापडी फुले व इको फ्रेंडली कलर आदी विघटनशील व पर्यावरण स्नेही वस्तूंचा वापर करून हे पर्यावरणस्नेही मखर बनवण्यात आले आहेत. या मखरांचा वारंवार पुनर्वापर करता येऊ शकतो. हे मखर फोल्डेबल असल्याने केव्हाही काढून व्यवस्थित ठेवता येतात व सहज इतरत्र नेता देखील येतात. शिवाय काही लोक एकदा दोनदा वापरून झाल्यावर ते आपल्या नातेवाईकांना देखील देतात.

### थ्रीडी मखर

फोल्डेबल तसेच थ्री डी मखरांना अधिक मागणी आहे. थ्रीडी मखरांना रंग, पीओपी, प्लायवूड, गरजेनुसार झाडाची फांदी व नैसर्गिक वस्तू याचा वापर आणि एलइडीची रोषणाई केलेली असते. तसेच स्वामी समर्थ नाव, विठ्ठल रखुमाई कलाकृती असलेल्या मखरांना पसंत आहे. तर सध्या मोरा चे मखरांना देखील पसंती आहे. या मखरांच्या किमती अगदी पंधराशे रुपयांपासून पुढे सुरू होतात. ग्राहकांच्या मागणी नुसार त्यांना कमी अधिक किमतीमध्ये मखर उपलब्ध करून दिले जातात.

रायगड जिल्ह्यामध्ये गणेशमूर्तींच्या सजावटीसाठी मखर तयार करण्याची क्रेझ गेल्या अनेक वर्षापासून आहे. वेगवेगळ्या आकाराच्या, रंगाच्या मखरांना कायमच पसंती असते. यावेळी देखील भक्तांनी बाप्पाच्या आरास सजावटीसाठी मखरांना प्राधान्य दिले.

> पर्यावरणस्नेह गणेशोत्सव साजरा करण्यात यावा यासाठी अतिशय नाममात्र शुल्कात अकरा रुपयामध्ये २१ पर्यावरणपूरक मखरांचे रविवारी (ता. २४) वाटप केले आहे. पर्यावरण पूरक व पर्यावरण स्नेही सण साजरे करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरण स्नेही मखर तसेच शाडूच्या मूर्तींना अधिक मागणी आहे. हे चित्र दिलासादायक दिसत आहे.
>
> -अंकुश आपटे, संस्थापक अध्यक्ष, आयुष्यमान व्यसनमुक्ती केंद्र

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी प्रशिक्षण

### विद्यार्थ्यांनी बनवल्या शाडू मातीच्या गणेश मूर्ती

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

पाली नगरपंचायत व इनरव्हील क्लब खोपोली यांच्या वतीने शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती बनविण्याचे विशेष प्रशिक्षण शिबिर टॉपवर्थ इंग्लिश मिडीअम स्कूल पाली येथे आयोजित करण्यात आले. माझी वसुंधरा अभियानाच्या उपक्रमांतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.



तज्ञ मार्गदर्शकांनी शाडू मातीचे महत्व, मूर्ती बनवण्याच्या सोप्या तंत्रांसोबत रंगकामासाठी पर्यावरण पूरक उपाय याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच इनरव्हील क्लब खोपोली यांच्या वतीने कचरा नियोजन आणि पर्यावरण संवर्धन याबाबत पथनाट्य सादरीकरण केले गेले.

या उपक्रमामुळे गणेशोत्सव साजरा करताना निसर्ग संवर्धनाची जाणीव नागरिकांमध्ये रुजविण्यास मदत होणार असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले.

या शिबिरात नगरपंचायत मुख्याधिकारी माधुरी मडके, आरिफ मणियार, प्रतिक्षा पालांडे, सर्व नगरसेवक, नगरसेविका सर्व सभापती, दिना शहा, मधुमिता पाटील, क्षमा आठवले, सुलभा बिनीवाले, राजश्री मुंदडा, सुमिता महर्षी, कोणकर, शाळेतील शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.



गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात गणपतीची मूर्ती प्रतिष्ठापनेसाठी घरी घेऊन जाणारे भाविक. (छायचित्र: समीर मालोदे)

## गणेशोत्सवाची तयारी पूर्ण

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यात गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी या दहा दिवसात मंगलमय वातावरण पहावयास मिळते. तालुक्यात सार्वजनिक गणपती चार तर घरगुती गणपतीची संख्या सुमारे ८,६८३ इतकी असून १,२२८ इतक्या गौरींची प्रतिष्ठापना होणार आहेत.

सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना संख्या अल्प असून मंडळाकडून पूर्व परंपरागत प्रथेमध्ये खंड न पडून देता पाच दिवस अथवा अनंत चतुर्दशीपर्यंत गणपती ठेवले जातात. गणपती सार्वजनिक असो वा घरगुती, कोकणवासीयांचा आवडता कार्यक्रम सायंकाळी अथवा रात्रीचे भजने व बैठे मोठ्या प्रमाणात खेळ खेळले जातात.

टाळ व मृदुंगाच्या ठेक्यावर भजने, भजनांचा कार्यक्रम आटोपल्यावर अद्यापही कोकणात पारंपारिक पद्धतीने खेळला जाणारा खेळ म्हणजे बैठक. यामध्ये नाल, घुंगरू, डफली या वाद्यांवर देव देवतां वर आधारित गीते बैठकीत म्हटली जातात. वादकांच्या भोवताली रिंगण करीत गीतांच्या तालावर पुरुष मंडळी ठेका धरतात.

## तळा शहरात ढोलकीचा आवाज घुमू लागला

| तळा | प्रतिनिधी |

कोकणात गणपतीच्या सणाला अत्यंत महत्व आहे.या गणेशोत्सवाच्या काही दिवस अगोदर शहरातून खांद्याला ढोलक्या अडकवून त्या विक्रीसाठी फिरणारे कारागीर दिसू लागतात. गाव शहरातून ढोलकी वाजवत फिरणाऱ्या या कारागिरांच्या ढोलकीचा आवाज कानावर पडला की आपोआप गणेशोत्सवाची चाहूल लागते. गणपतीच्या आरती वेळी बहुतेक घरातून ढोलकीचा सूर ऐकायला मिळतो. तो कानावर पडला की आरतीलाही रंगत भरली जाते.



गणेशोत्सवासाठी मोठी आरस, वाद्ये बाजारात विक्रीसाठी येत असतात. याचप्रमाणे ढोलकी विक्रीलाही तळ्यामध्ये सुरुवात झाली आहे.

मोकळ खोड, शेळीचे चामडे, चाव्या, पॉलिश, शाई आणि दोरी व वादी आदी साहित्य वापरून ढोलकीची बांधणी केली जाते.

ढोलकी विक्रेते दहा ते पंधरा ढोलक्या खांद्याला अडकवून तळा बाजारपेठेत विकताना दिसत आहेत. या ढोलक्या ३०० रुपयांपासून ८०० रुपयांपर्यंत विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. गणेशोत्सवात ढोलकीचा उपयोग आरती सोबतच भजनासाठी तसेच पारंपरिक गाणी वाजविण्यासाठीही होतो. त्यामुळे गणेशोत्सवात ढोलकीला मोठी मागणी करत आहेत.

## चर्मवाद्य दुरुस्तीसाठी ग्राहकांची मोठी रिघ

| नेरळ | प्रतिनिधी |

गणेशोत्सव आज सुरू होत असताना गणपती बाप्पाचे आगमन झाल्यानंतर प्रत्येक घरोघरी आवाज येतो तो आरतीचा. आरतीसाठी सर्वांना आवश्यकता असते ती चर्मवाद्य आणि अशा वाद्यांच्या खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड दिसून येत आहे. दरम्यान भजनी मंडळे भजनाचे सूर आळवणीसाठी आवश्यक असलेले पखवाजाची ग्राहकांची झुंबड चर्मवाद्य निर्माते यांच्याकडे गणेशभक्तांच्या रिघ लागल्या आहेत.

प्रामुख्याने गणेशोत्सव काळात पारंपरिक चर्मवाद्यांना मोठी मागणी वाढली आहे. गणपती बाप्पाचे आगमन



झाल्यानंतर भजन मंडळ, तसेच घरगुती आरत्या आणि वाद्यप्रेमी ढोलकी, तबला, पखवाज, मृदुंग या साहित्याची दुरुस्ती किंवा नवीन खरेदी करण्यासाठी भाविक धावपळ करीत होते. या वाद्यांची दुरुस्ती व तयारी करण्यासाठी धाव घेत आहेत. त्याचवेळी नवीन मृदुंग आणि वाद्य यांच्या खरेदीसाठी भाविक बाजारात भटकत असतात. त्याचवेळी दारोदार येणारे वाद्य विक्रेते यांच्याकडून देखील गणेश भक्त लहान आकाराची वाद्य खरेदी करताना दिसत आहेत.

तबला आणि मृदुंग दुरुस्तीसाठी कर्जत परिसरात गेल्या १०० वर्षांची परंपरा जपणारे रमेश तबलेवाले हे या क्षेत्रातील मानाचे नाव आहे. कर्जत रेल्वे स्टेशनजवळील जुन्या एसटी. डेपो लगत असलेल्या त्यांच्या कार्यशाळेत सध्या मोठी गर्दी होत आहे.

कर्जत शहरातील महावीर पेठेतील लहान दुकानापासून सुरू झालेला हा व्यवसाय आता जुन्या एसटी. स्टँडजवळ मोठ्या प्रमाणावर उभा राहिला आहे. रमेश तबलेवाले यांच्या हातातून फक्त वाद्यांची दुरुस्तीच नव्हे, तर सांस्कृतिक वारशाचे जतनही सातत्याने केले जात आहे.

## पार्किंग शुल्क वसुलीवरून हाणामारी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल जवळील मानसरोवर रेल्वेस्थानकासमोरील वाहनतळावर अवघ्या ३० रुपयांच्या पार्किंग शुल्काच्या वादातून झालेल्या तुंबळ मारहाणीने प्रवासी आणि वाहनचालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. या घटनेत रिक्षाचालक आणि पार्किंग शुल्क वसुल करणार्या कर्मचार्यांना सुद्धा दुखापत झाली असून दोन्ही गटातील तरुणांच्याविरोधात पोलिसांनी गुन्हे नोंदवले आहेत. रात्री घडलेल्या या प्रकारामुळे रेल्वे स्थानक परिसरातील सुरक्षेविषयी प्रश्नचिन्हे उभे राहिले आहे.

कळंबोलीतील सेक्टर ४ मध्ये राहणारे ३४ वर्षीय रिक्षाचालक दररोज रिक्षा मानसरोवर स्थानकाजवळील वाहनतळावर उभी करून मुंबईला कामावर जातात. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेला तरुण रात्री सुमारे आठ वाजता कामावरून घरी परत आल्यावर त्यांनी वाहनतळामधून स्वताची रिक्षा काढत असताना शुल्क वसुली करणाऱ्या तरुणाने ३० रुपयांची मागणी केली. मात्र, रिक्षाचालकांनी काही वेळे पूर्वीचे तुमच्या सहकार्याला पैसे दिले आहेत असे सांगताच पार्किंग शुल्क वसुल करणारे व रिक्षाचालक तरुण यांच्यात वाद झाला. या वादाचे रुपांतर मारहाणीत झाले. दोन्ही गटांतील तरुण किरकोळ जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात तक्रारी दाखल झाल्या आहेत.

### प्लास्टिकचा वापर टाळण्याकडे लोकांचा कल | वेगवेगळ्या रंगांच्या कलाकुसरीला नागरिकांची पसंती

## घरगुती मखरांना वाढती मागणी

| पनवेल | प्रतिनिधी |

**सरकारने गणेशोत्सवाला दिलेल्या राज्य महोत्सवाचा दर्जा लक्षात घेता, यावर्षीसुद्धा गणेशोत्सव धूमधडाक्यात साजरा केला जाईल. उत्सवासाठी भाविकांची जय्यत तयारी करीत आहेत. घरगुती गणेशपूजनासाठी मखरांची खरेदी सुरू आहे. पर्यावरणपूरक मखरांना सर्वाधिक मागणी आहे.**

कागदापासून विविध आकारांचे तयार केलेले मखर, वेगवेगळ्या रंगांची कलाकुसर नागरिकांना अधिक पसंत आहे. कृत्रिम फूल यांसारख्या वस्तूंचा वापर करत पर्यावरणस्नेही मखर तयार करण्यात आलेले आहेत. यात सर्वाधिक आकर्षक ठरत आहेत ते म्हणजे कापडी मखर. कारण या मखरामध्ये पाण्याच्या पाइपचा वापर करून त्यावर कपडा लावण्यात आला आहे. तसेच, त्यामध्ये एक लाइट सोडण्यात आली आहे. हे



मखर आकर्षक दिसत असून, यंदा या मखराला सर्वाधिक मागणी आहे.

प्लास्टिकचा वापर टाळण्याकडे लोकांचा कल आहे. शाडू मातीच्या मूर्तीसाठी आग्रह धरत इको-फ्रेण्डली मखरांचीसुद्धा भाविक मागणी करत आहेत. आकर्षक अशा तीन फूट उंचीच्या मखरांची किंमत दोन हजार, ५०० ते तीन हजारांपासून सुरू होते. आकार आणि रंगसंगतीच्या अनुषंगाने विविध मखरे ग्राहक खरेदी करीत आहेत.

पनवेल परिसरातील बाजारपेठेत असलेल्या दुकानांमध्ये कृत्रिम फुलांची सुंदर आरास बघायला मिळते. सुटी कृत्रिम फुले, या फुलांचे हार, माळांपासून बनविलेले मखर पाहायला मिळतात. सध्या या कृत्रिम फुलांना सर्वाधिक मागणी आहे. कृत्रिम फुलांपासून मखरे निर्मिती करण्याकडेसुद्धा कल आहे. फुलांच्या माळाही उपलब्ध आहेत. त्यांच्या किमती २५० रुपयांपासून आहेत. अर्धगोल आकारातील फुलांचे मखर दोन हजारांपासून मिळत आहेत.

पर्यावरणपूरक मखरांची खरेदी करताना दुसऱ्या बाजूला आकर्षक देखाव्यांमध्ये मंदिरांच्या आरासांनासुद्धा ग्राहकांची पसंती वाढत आहे. सिद्धिविनायक मंदिरापासून अगदी तिरुपती बालाजी मंदिरापर्यंत वेगवेगळ्या प्रकारची मंदिरे बाजारामध्ये ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. अष्टविनायक मंदिरांची प्रतिकृती दाखवणाऱ्या आरसाची किंमत १५ हजार रुपये असून, मोठ्या बालाजी मंदिराच्या आरसाची किंमत १६ हजार इतकी आहे. भवानी मंदिराची प्रतिकृती दर्शवणार्या मखराची किंमत १५ हजार असून लहान आकारांच्या मूर्तीसाठी असलेल्या मंदिरांच्या देखाव्यांची किंमत तीन हजार रुपयांपासून सुरू आहे.

### सुरेख मखर तयार

घरगुती गणपतीच्या सजावटीत मखर हा अविभाज्य भाग आहे. गणेशोत्सव जवळ येताच सुंदर आणि लक्षवेधी मखर खरेदी केले जातात. थर्माकोलच्या बंदीमुळे पर्यावरणस्नेही मखर घेण्याकडे भाविकांचा कल दिसून येत आहे. त्यानुसार, मोरपंखी, मंदिर, काचेचे आरसे अशा वेगवेगळ्या कलाकृती मखरांमध्ये पाहायला मिळत आहेत.

**महसूल व वन विभाग**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कार्यालय**
**कचेरी रोड, माणगांव, ता.माणगांव, जि. रायगड**
EmailID:altmangaon@gmail.com

**जाहीर सुनावणी नोटीस** दावा क्रमांकः ७८/२०२५

प्रति,
१. श्री. पांडू जानू कांबळे, रा. मांदाड ता. तळा जि. रायगड वादी
विरुद्ध
१. श्री. शंकर विश्वनाथ भट २. श्रीमती. मीरा वसुदेव मेंहदळे प्रतिवादी
दोघेही रा. मांदाड ता तळा जि. रायगड

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळ कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचीमध्ये नमुद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवुन मिळण्यासाठी न्यायधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारित करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक २९/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव, जि. रायगड येथे स्वतःवकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहुन बाजु मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचुन नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसुर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल. व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवुन न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसूची**

| गावाचे नांव | स.नं. | क्षेत्र (हे.आर ) | आकार |
|---|---|---|---|
| मांदाड ता.तळा | १४०/१/अ/२० | ०.४७.०० | ०.२५ |
| | १४०/१/अ/२६ | ०.४६.०० | ०.२५ |

ठिकाण:- माणगांव
दिनांक :- २२/०८/२०२५

सही/-
**(दशरथ काळे)**
**अपर तहसीलदार व**
**शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव**

## शुद्धीपत्रक

दैनिक कृषीवल वर्तमानपत्राद्वारे

दि.२६-०८-२०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल रायगड यांच्याद्धारे प्रसिद्ध झालेल्या कमळ नागरी सह. पतसंस्था मर्या. अलिबाग यांच्या थकीत कर्जदारांच्या जाहीर १०१ सुनावणीमधील जा.क्र. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कर्जत असे न वाचता तेथे पनवेल तसेच दिनांक २९-०८-२०२५ रोजी ऐवजी दिनांक २१-०८-२०२५ अशी सुधारीत रचना तमाम जनतेने वाचनात घ्यावी.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली सदनिका विद्यमान मालक श्री. वैभव विजय पोळ यांच्या मालकीची सदनिका त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची सदनिका ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर सदनिकेच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे.

**सदनिकेचे वर्णन**

अलिबाग नगर परिषद हद्दीतील मौजे अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ११४६, ११४६/१, ११४५/सी/२, ११४५/बी/२, ११४५/अ/२, ११४५/के/बी, या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या 'ओम सागर सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादीत' या इमारतीमधील अ विंग मधील पहिल्या मजल्या वरील निवासी सदनिका नं. १०२, क्षेत्र ६४१ चौ. फूट (५९.५७ चौ.मी) बिल्टअप ज्याचा अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ऐएलबी ००००१६०४ जुना नंबर झेड बीएचअे ००१६०६ जुना घर क्र. १३४३ अे विंग ही निवासी सदनिका या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल निवासी सदनिकेच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसबंध असल्यास व त्यांची वरील निवासी सदनिकेच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची निवासी सदनिका निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या निवासी सदनिकेचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड. मानस सुधाकर पाटील**
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ७७४३८०९६५३


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकतीचे मालकाने खालील नमुद मिळकत आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

**मौजे खरवंडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| राम नामदेव साळोखे | १७ | १/अ/२ | ०-२०-९० पो.ख.०-०१-१० एकूण ०-२२-०० | २-७५ |

वरीलप्रमाणे मिळकत त्यामधील तद्ंगभुत हक्कहितसंबंध सुद्धा.

ता. २७ ऑगस्ट २०२५

खरेदीदारातर्फे
**स्नेहल बंडु तुरडे**
ॲडव्होकेट हायकोर्ट
ऑफीस पत्ता :-गाळा नं.९, विहंग अपार्टमेंट
जय बजरंगबळी, कोतवाल नगर कर्जत, ता.कर्जत
जि.रायगड, पिन नं.४१०२०१
मो.नं.७६२०२२३९५९

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. २१२/२०२५

मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात
श्री. उमेश चंद्रकांत सावंत
वय ३४ वर्षे, धंदा : शेती अर्जदार
रा. कुमशेत
ता. माणगाव, जि. रायगड
विरुद्ध
१.निबंधक जन्म-मृत्यू व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कुमशेत
ता. माणगाव, जि. रायगड सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.
पंचायत समिती माणगाव, ता.माणगाव, जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. उमेश चंद्रकांत सावंत यांची आजी कै. जानकीबाई रामचंद्र सावंत ही दि.११-४-२०१८ रोजी मौजे कुमशेत, ता.माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. तिची मृत्यूची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०१-०८-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची आजी कै. जानकीबाई रामचंद्र सावंत ही दि. ११-०४-२०१८ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करुन मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. उमेश चंद्रकांत सावंत यांची आजी कै. जानकीबाई रामचंद्र सावंत ही दि. ११-०४-२०१८ रोजी मौजे कुमशेत, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**ता. :-२६-०८-२०२५**

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.२०८/२०२५

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**
श्री.अकील अब्दुल गणी सैन
वय:६७ वर्षे, धंदा शेती, अर्जदार
रा.मु.पो.टेमपाले,
ता. माणगांव, जि. रायगड
विरुद्ध
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत टेमपाले,
ता.माणगांव, जि.रायगड. सामनेवाला
२.गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री.अकील अब्दुल गणी सैन यांचा जन्म मौजे टेमपाले, ता. माणगांव, जि.रायगड येथे दि.०१/०६/१९५८ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १३/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे टेमपाले, ता.माणगांव, जि.रायगड येथे दि.०१/०६/१९५८ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री.अकील अब्दुल गणी सैन यांचा जन्म मौजे टेमपाले, ता.माणगांव, जि.रायगड येथे दि.०१/०६/१९५८ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव
ता. २५/०८/२०२५

सही
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड**
ई-मेल :- eerid24@gmail.com दूरध्वनी क्र.०२१४०/२५०८५७
निविदा सूचना क्र. २ सन २०२५-२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२३०४ हे सक्षम निविदाधारकांकडून (खुला) खालील कामांकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सूचना शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२३०४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाकडून सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रू. (लाखात) | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोरबे लपा योजना व पुनाडे लघु पाटबंधारे योजना पनवेल जिल्हा रायगड येथील मुख्य विहिरीचे मान्सूनपूर्व अत्यावश्यक काम करणे | १०.०० | १००००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| २ | साळोख लघु पाटबंधारे योजना, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथे धरणाच्या मुख्य विमोचक विहिरीची दुरूस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | ९.९० | ९९००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| ३ | पाटबंधारे उपविभाग कर्जत अंतर्गत असणाऱ्या उल्हास, पाताळगंगा, शिलार आणि पेज नदीच्या आवश्यक ठिकाणी गेजपट्टी लावण्याचे काम. | ९.८५ | ९९००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| ४ | राजनाला सिंचन समुह, ता. कर्जत, जि. रायगड येथील राजनाला मध्यम प्रकल्पांतर्गत राजनाला डावा कालव्यावर जलसेतू नसल्याने तात्पुरते एस्केप देण्याचे काम. | ९.८० | ९८००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| ५ | पाटबंधारे उपविभाग कर्जत अंतर्गत असणाऱ्या गाडी, किरकी आणि तळोजा नदीच्या आवश्यक ठिकाणी गेजपट्टी लावण्याचे काम. | ९.७५ | ९८००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| ६ | भिलवले लघु पाटबंधारे योजना, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे धरणाच्या रॉक टी ची आवश्यक दुरूस्ती करणे. | ८.०० | ८०००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| ७ | राजनाला सिंचन शाखा क्र. ३ राजनाला डावा कालवा, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथे मान्सून हंगामात मजुरांना गमबुट पुरविणे व आवश्यक यंत्रसामुग्री पुरविणेचे काम व पाटबंधारे उपविभाग कर्जत अंतर्गत तळोजा नदी, गाडी नदी, तालुका-पनवेल व पाताळगंगा नदी, तालुका खालापूर येथे मान्सून हंगामात आपत्कालीन परिस्थितीत यंत्रसामुग्री पुरविण्याचे काम | ८.०० | ८०००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| ८ | पाली भुतिवली शाखेअंतर्गत बामणोली, मोरबे व उसरण ल. पा. योजना येथील मजुरांना गमबुट पुरविणे, रेनकोट पुरविणे टॉर्च पुरविणे व इतर अत्यावश्यक यंत्रसामुग्री पुरविणे व आपत्कालीन परिस्थितीत मनुष्यबळ पुरविणे व इतर आवश्यक कामे करणे. | ७.०० | ७०००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| ९ | पाली भुतिवली शाखेअंतर्गत आंबेघर ल.पा. योजना, तालुका पेण, पुनाडे ल.पा.योजना, तालुका उरण येथील मजुरांचा गमबुट पुरविणे, रेनकोट पुरविणे, टॉर्च पुरविणे व इतर अत्यावश्यक यंत्रसामुग्री पुरविणे व आपत्कालीन परिस्थितीत मनुष्यबळ पुरविणे. तसेच धरण विहीर नजीक सुरक्षा रेलिंग बसविणेचे काम. | ७.०० | ७०००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| १० | पाटबंधारे उपविभाग कर्जत अंतर्गत उल्हास, पेज व शिलार नदी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथे मान्सून हंगामात आपत्कालिन परिस्थितीत यंत्रसामुग्री पुरविण्याचे काम व हेटवणे उपविभाग क्र. १, डंबर्डे पेण व पाटबंधारे उपविभाग, कर्जत कार्यालयीन कामासाठी वाहनचालक पुरविणे. | ७.०० | ७०००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| ११ | भिलवले सिंचन शाखेअंतर्गत भिलवले, कलोते-मोकाशी, डोणवत ल.पा. योजना व खरसुंडी वळण बंधारा, तालुका खालापूर, जिल्हा-रायगड येथील मजुरांना गमबुट पुरविणे, रेनकोट पुरविणे, टॉर्च पुरविणे व इतर अत्यावश्यक यंत्रसामुग्री पुरविणे व आपत्कालिन परिस्थितीत मनुष्यबळ पुरविणे व इतर आवश्यक कामे करणे. | ७.०० | ७०००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |
| १२ | साळोख शाखेअंतर्गत साळोख, अवसरे, ल.पा. योजना, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील मजुरांना गमबुट पुरविणे, रेनकोट पुरविणे, टॉर्च पुरविणे व इतर अत्यावश्यक यंत्रसामुग्री पुरविणे व आपत्कालीन परिस्थितीत मनुष्यबळ पुरविणे व इतर आवश्यक कामे करणे. | ६.०० | ६०००/- | ०६ महिने | ११८०/- जी.एस.टी. सहीत (ना परतावा) | वर्ग-७ व त्यावरील |

निविदा उपलब्ध कालावधी दि. २३/०८/२०२५ ते दि. ०१/०९/२०२५
निविदा उघडण्याचा कालावधी :- दि. ..../.../२०२५

१. आवश्यक त्या वर्गातील अधिकृत नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत सादर केल्यानंतर कंत्राटदारांना कोऱ्या निविदा देण्यात येतील.
२. निविदा सूचना कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड, पिन नं. ४०२३०४ यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर पहावयास मिळेल.
३. एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२३०४ यांनी राखून ठेवला आहे.
४. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप :- निविदा भरताना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

सही/-
**(इंजि. मिलिंद पवार)**
कार्यकारी अभियंता
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड

**विमाका/कोवि/२०२५-२०२६/१००**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय कॉंग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
**दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल :** ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./जाहीर नोटीस/सन २०२५/१९८४ दिनांकः-२६/०८/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे. त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार शिवलिला सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. ब्राम्हण आळी, अलिबाग जि.रायगड यांनी श्री अरुण दत्तात्रेय आठवले, श्रीदेवी सप्तशृंगी को-ऑप. हौ.सो., गोपाळ नगर रोड-१, डोंबिवली पूर्व, श्री उदय दत्तात्रेय आठवले रा.बी-१०, रत्नसागर को-ऑप. हौसिंग सो.सुदामा सो.जवळ, मुंबई पुणे रोड, कळवा पश्चिम, श्री श्रीराम दत्तात्रेय आठवले रा.आठवले वाडा ब्राम्हण आळी, गणपती मंदिरा जवळ, अलिबाग, श्रीम कविता प्रदिप साठे पूर्वीची निलिमा दत्तात्रेय आठवले, रा.मगनलाल को-ऑप हौसिंग सो.,कल्पना सोसा.जवळ, राम मारुती रोड, ठाणे पश्चिम, मे.चेतना एंटरप्रायझेस तर्फे भागीदार श्री घनःश्याम रतनचंद पुरस्वानी, श्रीम मधु अमरलाल पुरस्वानी, रा.कोहिनूर कॉम्प्लेक्स, सी विंग, चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड यांचेविरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड येथील नगर भूमापन क्रमांक-१११४, क्षेत्र १५६.३० चौ.मी., नगर भूमापन क्रमांक-१११४/२, क्षेत्र ३७४.६०चौ.मी., याचे एकूण क्षेत्र ५३०.९० चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ०९/०९/२०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक २६/०८/२०२५

सही/-
**(प्र.का.जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड-अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर.पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| ७३/४ | एकूण क्षेत्र ०-३२-०० हे. आर. | ०.१२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ४ (चार) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २७/०८/२०२५
ठिकाण : पनवेल

**ॲड.रोहित रो.मानकवळे**
मो.नं.९०२८८१७९३०
पत्ता-शॉप नं.२३, प्लॉट नं.५१,
कल्पतरू कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी,
पनवेल, ता.पनवेल जि.रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांधई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतींचे मालक शरद श्रीनिवास पाटील व श्रीलेखा शरद पाटील यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/प्लॉट नंबर | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ५५/३/ड | ००.१५.५० | ०-६२ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकत व त्यामधील घर या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २६ ऑगस्ट २०२५

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि. कोतवालनगर कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| ९६/५/अ | एकूण क्षेत्र ०-३९-०० हे.आर. | ०.२८ |
| ९६/५/क | एकूण क्षेत्र ०-६३-०० हे.आर. | ०.४४ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ४ (चार) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २७/०८/२०२५
ठिकाण : पनवेल

**ॲड.रोहित रो.मानकवळे**
मो.नं.९०२८८१७९३०
पत्ता-शॉप नं.२३, प्लॉट नं.५१,
कल्पतरू कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी,
पनवेल, ता.पनवेल जि.रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक अशिष गिरीधरलाल वैद यांच्यांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (आर.चौ.मीटर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १) म्हात्रोळी, ता.अलिबाग | १९४/२ | ०-४०-९० | ५.४८ |
| २) म्हात्रोळी ता.अलिबाग | २२६/१/२ | २-३१-९० पैकी क्षेत्र ०-२४-३० | १६.४३ |
| ३) म्हात्रोळी, ता.अलिबाग | २२६/२ | ०-२४-३० | २.५० |

सदरहू जमीन मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २६/०८/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,
ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग,
ता. अलिबाग जि. रायगड.

# माऊलीचा संसार उघड्यावर

## बाप्पा, तुला कुठे ठेऊ रे!

## आजी जनाबाईंची गणेशाकडे आर्त हाक



| अलिबाग | प्रतिनिधी |

आमचं संगळं वाटोळं होऊन गेलंय. घरातील सामान, कपडालत्ता, सगळं-सगळं गेलंय. आमचं काहीच राहिलं नाही. मेल्यात गिणती आहे आमची. संसार उघड्यावर पडला असून, आम्ही रस्त्यावर हाय बघा. गळ्यात अपंग मुलगा, गोठा पाडल्याने ऐन पावसात निवारा हरवलेली गुरे.. सगळंच एका झटक्यात संपवून टाकलंय या शासनकर्त्यांनी, असा सुरकुतलेल्या चेहऱ्यावरील संताप, चीड अन् खोलवर गेलेल्या डोळ्यातून वाहात असणारे जनाबाई आजींचे अश्रू मनातील यातना सांगून गेले. डोक्यावरील छत हरवल्याने वर्षानं पाहुणा येणाऱ्या बाप्पाला ठेवायचे कुठे, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे.

उसर येथील मेडिकल कॉलेजच्या बांधकामासाठी जमीन दिली गेली आहे. अशावेळी, त्या ठिकाणी एका जनाबाई माऊलीच्या घराचा थोडा भाग मेडिकल कॉलेजच्या जागेत निघाला. ही जागा ग्रामपंचायतीकडून २-४ वर्षांपूर्वी खरेदी केली गेली. जवळजवळ ५० वर्षांपूर्वी हे घर बांधले होते. आणि गुरांचा गोठा ६५ वर्षांपूर्वी बांधला होता. पण, आज मेडिकल कॉलेजच्या बांधकामासाठी त्या माऊलीचे ज्या घरात माऊलीचा अपंग मुलगाही आहे, ते घर आणि गुरांचा गोठा जमिनदोस्त करण्यात आला.

ज्या मेडिकल कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना सेवेचे संस्कार दिले जातील. त्याच मेडिकल कॉलेजचा पाया रचताना एका माऊलीचा आक्रोश त्या पायामध्ये पुरला गेला. तिच्या डोळ्यासमोर पै पै साठवून बांधलेले घर पडले. तिच्या आयुष्याची पायरी-पायरी विटांनी रचलेली स्वप्नं धुळीस मिळाली. या वयात त्या माऊलीला झालेलं दुःख कोणाला तळतळाट देऊन जाणार? ती माऊली आणि तिचा मुलगा फक्त काही दिवस वेळ मागत होते. ऐन गणपतीच्या सणाच्या तोंडावर शासनाची अवकृपा माऊलीला भोगावी लागली. गणपती होईपर्यंत किंवा पाऊस जाईपर्यंत तरी ते घर पाडणे रोखू शकले असते ना. आज दोन अडीच हजार पेंड्या पावसात भिजून खराब होत आहेत. आणि गुरेही उघड्यावर पावसात भिजत आहेत. पण, जिथे मनं मेलेली असतील, तिथे भावनांची अपेक्षा करणंच चुकीचं आहे. आज पोलीस बंदोबस्तामध्ये एका माऊलीचे घरकुल आणि गुरांचा गोठा पाडताना माऊलीचा आक्रोश काळीज पिळवटणारा होता. त्या आक्रोशाला न्याय मिळणे सध्याच्या काळात कठीणच आहे. म्हणूनच वाटते इथे, जनता हरली... सत्ता जिंकली.

### विनविण्या करुनही प्रशासनाचे दुर्लक्ष

कित्येक वर्षापासून उसर येथील जनाबाई शिंदे या वयोवृध्द महिलेचे घर होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला अडथळा ठरण्याचे कारण दाखवून प्रशासनाने ते घर जेसीबी लावून मोडून टाकले. घर तोडू नका चार सप्टेंबरपर्यंत मुदत द्या अशी मागणी वयोवृध्द महिला करीत होती. घर तोडू नये म्हणून जिल्हाधिकारीपासून तहसीलदारांकडे दाद मागितली. रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्याकडेदेखील विनवणी केली. मात्र कोणीच ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. सकाळी अकरा वाजल्यापासून पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. पोलीस बळाचा वापर करीत आजीबाईला घरातून बाहेर काढण्यात आले. या प्रकारामुळे पोलीस आणि प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजीचे सूर उमटत आहेत.

# पीएनपीच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग रायगड व जेएसएम ज्युनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा नुकत्याच आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धांमध्ये पीएनपी होली चाईल्ड स्कूल वेश्वी अलिबाग शाळेतील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश संपादन केले यामध्ये १४ वर्ष वयोगट मुले द्वितीय क्रमांक, १४ वर्ष वयोगट मुली प्रथम क्रमांक, १७ वर्ष वयोगट मुली द्वितीय क्रमांक मिळवून त्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत निवड झाली आहे.

या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, होली चाईल्ड एस एस सी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले व उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा मार्गदर्शक अक्षय डाकी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाचे

# कुस्ती स्पर्धेत यश

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत पी.एन.पी. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून अलिबाग तालुक्यात क्रीडा क्षेत्रात दबदबा कायम ठेवला आहे. पी.एन.पी. कनिष्ठ महाविद्यालय नेहमीच गुणवंत विद्यार्थ्यांबरोबरच गुणवंत खेळाडू निर्माण करत असते, याचा प्रत्यय कुस्ती स्पर्धेत दिसून आला.

१७ वर्षे वयोगटातील ४९ किलो वजनी गट मुली यामध्ये वेदिका जयेंद्र सुतार हिने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच १९ वर्षे वयोगटातील ५५ किलो वजनी गट मुली यामध्ये धनुजा रमेश गुंड हिने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच १९ वर्षे वयोगटातील ५७ किलो वजनी गट मुले यामध्ये निशाल बाबूराम मांझी याने प्रथम क्रमांक पटकावला. सर्व विजेत्या खेळाडूंचे संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, प्राचार्य रविंद्र पाटील, संचालक विक्रांत वार्डे, क्रीडा शिक्षक तेजस म्हात्रे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. पीएनपी महाविद्यालयाने शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला आहे. कुस्ती या क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांना उभारी मिळावी, म्हणून महाविद्यालयातील क्रीडा शिक्षकांकडून मार्गदर्शन दिले जाते. त्यामुळे पीएनपी महाविद्यालय क्रीडा क्षेत्रात वेगळ्या उंचीवर असल्याचे चित्र आहे.




## गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा



ज्योतिषी डॉ. महेश देशपांडे

जन्मकुंडलीच्या आधारे आपल्या जीवनात येणाऱ्या अनेक अडचणीतून समाधानाने बाहेर पडण्यासाठी एकदा अवश्य भेट द्याच. मुलांचा अभ्यास, त्यांची शैक्षणिक दिशा, स्पर्धा परीक्षा, नोकरी, परदेशगमन, विवाह, आर्थिक स्थिती, आजारपण या आणि अशा अनेक प्रकारच्या समस्यांविषयी सखोल मार्गदर्शन व अनुभविक उपाय सुचविले जातील.
वास्तुदोषदेखील तोडफोड न करता निवारण केले.
फोनवरुनदेखील अपॉइन्टमेन्ट घेऊन सल्ला दिला जाईल.

त्वरित भेटा

ज्योतिषी **डॉ. महेश देशपांडे**, ज्योतिषवाचस्पती,
संजय गांधी हॉस्पिटलजवळ, रोहा-रायगड
(अपॉइन्टमेन्ट आवश्यक)
संपर्क : ९२७००१२६५६/९६५७००१५१६

दर महिन्याच्या पहिल्या रविवारी आता पनवेलला मार्गदर्शन घेता येईल.



## कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



: प्रायोजक :
नागरी सहकारी पतसंस्था (मर्यादित) अलिबाग
आरडीसीसी बँक — सहप्रवास प्रगतीचा — ISO 9001 - 2015 BANK

जिंका रोज आकर्षक बक्षिस

प्रवेश मूल्य २०० रु. (फोटो काढण्याचे मूल्य वेगळे आकारले जाईल.)

### आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

**फोटोसाठी स्थानिक संपर्क**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सुरेश खडपे (चौल) : | ९९२१०५४६०६ | समीर रिसबुड (श्रीवर्धन): | ९८८१९२२८३५ | भूषण सुतार (सुधागड) : | ८१४९६६४०५८ |
| जीवन पाटील(भाकरवड) : | ७०६६८९८६३७/ ८१४९६६३८१३ | दत्ता म्हात्रे : (चिरनेर) : | ७२०८३७७१०५ | सत्यप्रसाद आढाव (रोहा) : | ८९८३४२०१६१ |
| संजय गायकवाड (कर्जत) : | ९४२३३७७९०० | जुनेद तांबोळी (महाड) : | ८४११९२४४६२ | अब्दुल सोगावकर (सोगाव) : | ९९६०४८११३३ |
| समीर मालोदे (अलिबाग) : | ९४२३३७५३६१ | शैलेश पालकर (पोलादपूर) : | ९२२६८४९१८५ | गणेश चोढणेकर (मुरुड) : | ९२६००१६३२३ |
| मुकुंद रांजणे (माथेरान) : | ७५०७६७३८७९ | कांता हाबळे (नेरळ) : | ९२०९२३८७६९ | वैशाली मलबारी (पेण) : | ८९८३९३६४५५ |
| अनिल गवळे (वेणगाव) : | ९६८९९५४४२४ | राजू नेवासेकर (मुरुड) : | ९९२१६२३८४८/ ८२३७१३८९७४ | अल्ताफ चोरडेकर (रोहा) : | ८८०५२४९५६७ |
| नंदकुमार मरवडे (खांब) : | ८३०८६८८२२९ | मुस्कान खान (पेण) : | ८९२८९११३९१ | सिद्धी दाखिणकर (माणगाव) : | ७४९९३११८१७ |
| सलीम शेख (माणगाव) : | ९४२३३८२७८९ | राकेश खराडे (रसायनी) : | ९६६५३१४११५ | महेश पवार (नागोठणे) : | ९२२५४७००३७ |
| सुधीर नाझरे (मुरुड): | ९४२३३७७२४२ | बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा): | ९८६०६०९६५४ | | |

**स्पर्धेचे स्वरुप**
- आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला 'कृषीवल'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
- स्पर्धा २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत घेतली जाईल.

फोटो पाठविण्याची वेळ स. १०.३० ते संध्या. ५.३० वा. पर्यंत.

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा
krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906



जय गणेश



ज्येष्ठेभ्यो ज्येष्ठराजाय ज्येष्ठपदप्रदायिने महोदराय पूर्णाय पूर्णानंदाय ते नमः

**दैनंदिन कार्यक्रम:**
श्रींचे आगमन मिरवणूक - दि. २७ ऑगस्ट: स. ८.३० वा. मंदिरापासून
श्रींचे दैनंदिन अभिषेक/महापूजा: दि. २८ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर स. ७ ते सायं. ५
गणेशयाग (उत्सव मंडप): शुभारंभ - २७ ऑगस्ट - दु. १ वा.
दि. २८ ते ३१ ऑगस्ट स. ८ ते १२, दु.१२.३०ते ४.३०
सहस्त्राभिषेकम्, लक्षार्चना व गणेशयागः दु.१२ ते ४ दि. १ व २ सप्टेंबर: श्रींचे मंदिरात
सामुहिक सूर्य नमस्कार: दि. २९ ऑगस्ट: स.६
सामुहिक अग्नीहोत्र: दि. ३० ऑगस्ट: स.६
मंत्र जागर: दि. ३ सप्टेंबर: दु. ३ वा.
सत्यविनायक पूजा: दि. ५ सप्टेंबर: दु.४ ते ६
महिला हळदी-कुंकू: दि. ५ सप्टेंबर: सायं.७ ते ८
"श्री गणनायक" रथातून श्रींची भव्य विसर्जन मिरवणूक दि. ६ सप्टेंबर २०२५ - दु. ४ वाजता

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे

जय गणेश

### सर्व गणेशभक्त बंधू-भगिनींना सस्नेह निमंत्रण - गणेशोत्सव २०२५

वर्ष १३३वे

**'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना** आज बुधवार दि. २७/०८/२०२५ सकाळी ११.११ वा.
प.पू.आदरणीय श्री घनशामाचार्य महाराज, पीठाधिपती श्री रामानुजाचार्य श्री झालरिया, श्री दास हनुमान देवस्थान, चित्रकूट यांच्या शुभहस्ते

**देखाव्याच्या विद्युत रोषणाईचे उद्घाटन:** "पद्मनाभस्वामी मंदिर, तिरुवंतपूरम" सायं. ७ वाजता
ना.माधुरीताई मिसाळ, राज्यमंत्री, महाराष्ट्र यांच्या शुभहस्ते

**ऋषि पंचमी:** दि. २८ ऑगस्ट, पहाटे ६ वाजता महिलांचे अथर्वशीर्ष पठण
प्रमुख पाहुणे: मा.खासदार सौ. सुनेत्राताई पवार, मा.रजनीताई किरण क्षिरसागर, धर्मादाय सहआयुक्त, पुणे

**हरी जागर:** द्वारा समस्त वारकरी बंधू - दि. २८ ऑगस्ट, रात्री १० ते १२

भारतीयांचे श्रध्दास्थान आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या या मंगलमूर्तीचा वैभवशाली उत्सव आज बुधवार दि. २७ ऑगस्ट ते शनिवार दि. ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत दत्त मंदिर समोरील, बुधवार पेठ येथील पारंपारिक जागेत संपन्न होत आहे. अथर्वशीर्ष आवर्तने, महाभिषेक पूजा, गणेशयाग, हरीजागर, सत्यविनायक असे पवित्र धार्मिक विधी यावेळी संपन्न होणार आहेत. या सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी होऊन हा पवित्र उत्सव आनंदाने पार पाडावयाचा आहे. आपल्या चरणी विनम्र प्रार्थना की आपण 'श्रीं'च्या या पवित्र उत्सव सोहळ्यात सहभागी होवून दर्शन - प्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती.



प.पू.श्री घनशामाचार्य महाराज



मा.माधुरीताई मिसाळ



मा.सौ.सुनेत्राताई पवार

वेबसाईट क्युआर कोड

दररोज बाप्पांची आरती: वेबसाईट, YouTube, facebook, Instagram



पद्मनाभस्वामी मंदिर, तिरुवंतपूरम

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे ■ सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे
गणपती भवन, २५०, बुधवार पेठ, पुणे २, फोन: २४४७९२२२ ■ गणपती सदन, १३२, बुधवार पेठ, शैक्षणिक संकुल, पुणे २, फोन: २४४९२०००
E-mail: contact.dhgt@gmail.com
jayganesh.dhgt@gmail.com
बाप्पांचे ॲप डाऊनलोड करा: २४ तास बाप्पांचे थेट दर्शन


कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)